संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 4 | Issue : 1 | Marathi Monthly | Thane, 1 July 2026 to 31 July 2026 | Pages 16 | Price : 10/-

# रोहा येथील अंशुल इनोव्हेटिव्ह कंपनीतील संपाच्या ७३ दिवशी

## धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाकडून संपकरी कामगारांना आर्थिक मदत




**रोहा (जि. रायगड) : मे. अंशुल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्री प्रा. लि. येथील कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी आदरणीय राजन राजे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या बेमुदत संपाला आज ७३ दिवस पूर्ण झाले. गेल्या ७३ दिवसांपासून सुरू असलेला हा संघर्ष कामगारांच्या एकजुटीने आणि निर्धाराने सुरू असून, या पार्श्वभूमीवर धर्मराज्य पक्ष प्रणित धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाच्या वतीने संपकरी कामगारांना आर्थिक व नैतिक पाठिंबा देण्यात आला.**

संपकरी कामगारांना संघर्षकाळात आर्थिक आधार मिळावा या उद्देशाने महासंघाच्या वतीने प्रत्येक संपकरी कामगारास ₹१०,००० ची आर्थिक मदत धनादेशाच्या स्वरूपात प्रदान करण्यात आली. ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून, संपूर्ण धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ आणि त्याच्याशी संलग्न विविध युनिटमधील कामगार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत, हा विश्वासही यानिमित्ताने व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी महासंघाचे महासचिव महेशसिंग ठाकूर, उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, सचिव समीर चव्हाण, खजिनदार अजित सावंत, सुल्झर पंप्स इंडिया एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस विनोद मोरे, निरंजन म्हात्रे, जगन्नाथ सलगर, महेश पवार तसेच विविध युनिटमधील पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. वॉलमेट फ्लो कंट्रोल युनिटमधील कमलेश कोल्हे, अविनाश बडे, लोटन येलवे, निलेश घरत, दिनेश पाटील यांच्यासह हिवा इंडिया नितीन भुरे, विनोद गायकवाड, एलजी दिपक जाधव, हेमंत कदम, इडिकॉनचे राजेश कदम, राकेश म्हात्रे ...पृष्ठ क्र. २ वर

**'धर्मराज्य पक्ष' प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष राजन राजे यांच्या मार्गदर्शनाखाली मे. अंशुल इनोव्हेटिव्ह केमिकल्स प्रा. लि., (रोहा, रायगड) या कंपनीतील प्रदीर्घकाळ तुटपुंज्या पगारावर ('रोहा-धाटाव MIDC'तील हानिकारक रासायनिक-प्रदुषणात काम करत, केवळ रु. १३ हजाराच्या आसपासच मासिक-वेतन घेणारे) कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी गेल्या ५५ दिवसांपासून निर्धारपूर्वक सुरु असलेल्या बेमुदत संपाला, ऐक्य व पाठिंबा दर्शविताना मे. डीआरटी अँथिया (रोहा, रायगड) मधील 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सभासद असलेल्या कामगारांनी ५०,०००/- (रु. पन्नास हजार) ची आर्थिक मदत दिली.** तसेच, ''या क्रांतिकारी-लढ्यात, आम्ही कायम तुमच्या सोबत आहोत आणि यापुढेही राहू'', ही पोलादी कामगार-एकजुटीची ...पृष्ठ क्र. २ वर

**दि. ०८/०६/२०२६ रोजी मेसर्स. वॉलमेट फ्लो कंट्रोल प्रा. लि., डोंबिवली/अंबरनाथ येथील कंत्राटी कामगार सभासदांनी त्यांना कायमस्वरूपी (परमनंट) सेवेत सामावून घेण्यात आल्याबद्दल 'धर्मराज्य पक्ष' व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष राजन राजे यांची ठाणे येथील कार्यालयात सदिच्छा भेट घेतली.** ...पृष्ठ क्र. ३ वर



अंतरंग




ठाणे रिंग मेट्रो प्रकल्पास स्थगिती देण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी
पृष्ठ क्र. २




कॉक्रोच जनता पार्टी विचार करायला हवा.....
..हेमंत कर्णिक
पृष्ठ क्र. ८

''संकट तेलाचं नव्हे...तेल, हेच संकट!''
...राजन राजे
पृष्ठ क्र. ९



इडिकॉनचा दिलीप राणे... 'धर्मराज्य'चं बावनकशी नाणे!
...राजन राजे
पृष्ठ क्र. ९

# ठाणे रिंग मेट्रो प्रकल्पास स्थगिती देण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : ठाणे शहरातील सुमारे १२,२०० कोटी खर्चाच्या प्रस्तावित रिंग मेट्रो प्रकल्पास तात्काळ स्थगिती देऊन त्याचे स्वतंत्र तांत्रिक, पर्यावरणीय व कायदेशीर पुनर्मूल्यांकन करण्यात यावे, अशी मागणी 'धर्मराज्य पक्षा'ने मुख्यमंत्री, ठाणे महानगरपालिका, एमएमआरडीए व महा मेट्रोकडे निवेदनाद्वारे केली आहे.**




'धर्मराज्य पक्षा'चे सचिव नरेंद्र पंडित यांनी दिलेल्या निवेदनात प्रकल्पाच्या डीपीआरमधील त्रुटी, विद्यमान मेट्रो मार्गांशी होणारी पुनरावृत्ती, वाहतूक व्यवस्थेवरील संभाव्य परिणाम, ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील भूमिगत कामांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी तसेच पर्यावरणीय परिणामांबाबत गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

प्रकल्पासाठी दर्शविण्यात आलेल्या झाडांच्या परिणामाबाबतची अधिकृत आकडेवारी व प्रत्यक्ष परिणाम यामध्ये मोठी तफावत असल्याचा दावा करत स्वतंत्र पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

'धर्मराज्य पक्षा'ने रिंग मेट्रोची सर्व कामे तत्काळ स्थगित करणे, संपूर्ण डीपीआर स्वतंत्र तज्ज्ञ समितीकडे पुनर्परीक्षणासाठी देणे, पर्यावरणीय अहवाल सार्वजनिक करणे, नागरिक व तज्ज्ञांची खुली सार्वजनिक सुनावणी घेणे आणि सर्व कायदेशीर व पर्यावरणीय मंजुरी मिळाल्याशिवाय प्रकल्प पुढे न नेण्याची मागणी केली आहे.

**''ठाणेकर नागरिकांच्या सहभागाशिवाय आणि पर्यावरणीय परिणामांचा सखोल विचार केल्याशिवाय इतका मोठा प्रकल्प राबविणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे शासनाने या प्रकल्पाचा फेरविचार करावा,'' असे धर्मराज्य पक्षाचे सचिव नरेंद्र पंडित यांनी म्हटले आहे.**

## रोहा येथील अंशुल इनोव्हेटिव्ह कंपनीतील संपाला ७३ दिवस पूर्ण ...पृष्ठ क्र. १ वरुन

आणि अन्य कंपन्यांतील कमिटी सदस्यांनीही उपस्थिती लावली.

कार्यक्रमादरम्यान विविध युनिटमधील पदाधिकाऱ्यांनी व कामगार प्रतिनिधींनी आपली मनोगते व्यक्त केली. सुल्झर पंम्प्स इंडिया एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस विनोद मोरे यांनी आपल्या भाषणात, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ केवळ कामगारांचा पगार वाढवण्यासाठीच कार्य करत नाही, तर प्रत्येक कामगाराने स्वाभिमानाने आणि सन्मानाने जगावे यासाठी संघटना सातत्याने कार्यरत आहे, असे मत व्यक्त केले.

**यावेळी महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी संघटनेच्या कार्यपद्धतीविषयी माहिती देताना सांगितले की, करार झालेल्या कामगारांकडून संघटनेकडे जमा होणारे निधीचे स्रोत हे केवळ कामगारांच्या हितासाठी आणि कल्याणासाठीच वापरले जातात. संपकरी कामगारांना देण्यात आलेली आर्थिक मदत हे त्याचेच एक उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अंशुल इनोव्हेटिव्हमधील संघर्ष हा केवळ एका कंपनीपुरता मर्यादित नसून संपूर्ण कामगार चळवळीशी संबंधित असल्याने महासंघाच्या सर्व युनिट्सनी संपकरी कामगारांचे मनोबल उंचावण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.**

उपस्थित सदस्यांनी, संपकरी कामगारांनी गेल्या ७३ दिवसांत दाखविलेली जिद्द, चिकाटी आणि एकजूट यांचे कौतुक केले. कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत व्यवस्थापन आणि कामगार प्रतिनिधी यांच्यात सकारात्मक चर्चा होऊन लवकरच समाधानकारक तोडगा निघावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. संपकरी कामगार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परस्परांशी संवाद साधत संघर्षाच्या पुढील वाटचालीबाबत चर्चा केली.

**मा. राजन राजे (भाई) यांचे मार्गदर्शन, त्यांचा प्रदीर्घ संघटनात्मक अनुभव, विषयांचा सखोल अभ्यास आणि कामगार चळवळीप्रती असलेली निष्ठा आणि बांधिलकी यांमुळे या संघर्षाला योग्य दिशा व बळ मिळत आहे. त्यांच्या नेतृत्वावर असलेल्या दृढ विश्वासाच्या बळावर कामगार आपले न्याय्य ध्येय निश्चितपणे साध्य करतील, याबाबत कोणतीही शंका नाही.**

दरम्यान, संबंधित मागण्यांवर न्याय्य तोडगा निघेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका संपकरी कामगारांनी पुन्हा एकदा स्पष्ट केली. संघर्ष कितीही काळ चालला तरी अंतिम विजय कामगारांचाच होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

...पृष्ठ क्र. १ वरुन

भावना, कामगारधर्माचा आदर्श जोपासणाऱ्या अँथिया कंपनीच्या कामगारांनी या सदिच्छा भेटीतून दाखवली...त्याबद्दल, त्यांचं कौतुक व्हायलाच हवं! विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत रबाळे-नवी मुंबईमधील 'इडिकॉन-कंपनी'च्या पार पडलेल्या पगारवाढीच्या त्रैवार्षिक-कराराचा आनंद-सोहळा आटोपताच, लढाऊ अंशुल-कामगारांप्रति आपली सहसंवेदना जागवत, याच इडिकॉन कामगारांनी 'दिलीप राणे' यांच्या नेतृत्त्वाखाली लागलीच रोह्याला भेट देऊन....अंशुल कामगारांना महिनाभरापूर्वी अशाच स्वरुपाची मदत देण्याचं औदार्य दाखवलं होतं!



# कार्यकर्त्यांनी एकदा आरशात पाहण्याची गरज आहे....

देवेंद्र फडणवीसांची मुलगी उत्तम शिक्षण घेत आहे...!!

अजितदादांची मुलं आज सर्वांसमोर आहेत...!!

मुख्यमंत्र्यांचा मुलगा मास्टर ऑफ सर्जरी (MS) केलेला आहे... (त्या परीक्षेला हिना गावितही होत्या. त्याही पास झाल्या...!!)

सुप्रिया ताईंची लेक अशीच वेल-सेटल्ड आहे...!!

अमित ठाकरेंना काही वर्षांपूर्वी कर्करोगाचे निदान झाले. जीवापाड धावाधाव करून बापाने आपले कर्तव्य निभावले...!!

पोखरियाल निशंक यांची मुलगी एअरफोर्समध्ये, तर ओम बिर्लांची कन्या आयएएस आहे...!!

पहिल्या-दुसऱ्या फळीतील नेत्यांची लेकरं अशीच आहेत...!!

आता पत्रकार आणि विचारवंतांकडे वळू...!!

पार्थ एम. एन. या नावाने 'लोकसत्ता'मध्ये स्तंभलेखन करणारा दुसरा-तिसरा कोणीही नसून, निखिल वागळे यांचा मुलगा आहे...!! वयाची तिशी असेल आणि असा 'प्लॅटफॉर्म' मिळालाय...!!

राजदीप सरदेसाई यांचा मुलगा नाक, कान, घसा (ENT Surgeon) तज्ज्ञ आहे...!!

विश्वंभर चौधरी यांची जुळी अपत्ये शालेय जीवनापासूनच टॉप नॉच आहेत...!!


ही यादी न संपणारी आहे...!!

अगदी भालचंद्र कांगो यांची लेक सिनेमात येऊन गेली...!!

(पापा कहते हैं, होगी प्यार की जीत....)

तर 'मुंज्या' सिनेमातील नायिका ही मनोहर जोशी यांची नात...!!

या मुलांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. यांची





मेहनत आणि एवढा मीडिया आसपास असूनही, यांनी कुठेही न बहकता आधी आपले करिअर केले...!!

कार्यकर्त्यांना कधी येणार ही समज, देव जाणे...!!

फोडा गाड्या, तोडा दुकानं, हाणा डोकी, घाला शिव्या...!! प्रार्थनास्थळं तोडा किंवा भर रस्त्यात गाय कापा...!! तुम्हाला कोणी काळं कुत्रं विचारत नसतं, हे सत्य आहे...!! पोलीस गुन्हा दाखल करतात, वकिलापासून सगळं स्वतःच्या खिशातून बघावं लागतं... ही असली फालतू कामं करताना शिक्षणाचा बोऱ्या वाजलेला असतो. आवडती मुलगी भाव देत नाही... नोकरीत कोणी वाव देत नाही... समाजात नाव घ्यावं असं कर्तृत्व नाही... साहेबांच्या एका कटाक्षासाठी साला आमचा जीव तयार...!! साहेबांचं लक्ष गेलं की, जन्मभर लक्षात राहणार...!!

आणि ही विशीतली मुलं... जात, धर्म, भाषा आणि त्याहीपुढे साहेबांच्या घराण्याची आन, बान आणि शान यावरून बहकताना, यांचे आई-वडील काय करत असतात, देव जाणे...!!

शिक्षण नाही... पैसा नाही... तरीही मुलं कशी वाढवायची, हे नरेंद्र जाधव आणि डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या पालकांकडून शिकावं... अन्नामलाई किंवा इरफान आणि युसूफ पठाण यांच्या आई-वडिलांकडून शिकावं... पण कठीण आहे ते...!! शिकणं टाळलेलंच बरं वाटतं बाकीच्यांना...!!

घाला राडे, घ्या केसेस अंगावर... जा कोर्टातील तारखांना....!! नोकरीत काळं कुत्रंही घेत नसतं.... १७-१८ वर्षे जुन्या केसेसच्या निकालांचे डिटेल्स विचारायला लोक फोन करतात.... कारण, नोकरीत ते लागतं... केस चालू असेल तर विषयच संपतो...!!

या देशात 'नेपोटिझम' म्हणजे 'आपला तो बाब्या' ही परंपरा आहेच... पण आमच्या रक्तात पसरलेली गुलामगिरी तिला पोसते, हे कोणीच लक्षात घेत नाही...!!

एक डार्क विनोद आठवतो...

'तारीख' आणि 'डेट' यात फरक काय...??

'एलिट' लोकांची मुलं डेटला जातात...!!

कार्यकर्ते 'तारखेला' जातात...!!

*...सौरगण*

## मेसर्स. वॉलमेट फ्लो कंट्रोल प्रा. लि.

...पृष्ठ क्र. १ वरुन

यावेळी कामगार प्रतिनिधींनी श्री. राजन राजे यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला तसेच कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी सातत्याने उभारलेल्या संघर्षाबद्दल व मिळालेल्या न्यायाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. या प्रसंगी संघटनेचे उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, सचिव समीर चव्हाण, निरंजन म्हात्रे तसेच वॉलमेट युनिट कमिटीचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.





# जैवविविधतेचा ऱ्हास भारताला महागात; 'नेचर' नियतकालिकाचा देशाला इशारा, महाराष्ट्र बोध घेणार काय?

जैवविविधता हा शब्द ऐकला की बहुतेकांच्या डोळ्यांसमोर जंगल, वाघ, पक्षी, नद्या किंवा समुद्र उभे राहतात. त्यामुळे हा विषय पर्यावरणवाद्यांच्या चर्चेपुरता मर्यादित असल्याची धारणा तयार झाली आहे. मात्र, प्रतिष्ठित नेचर नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनाने ही समजूत पूर्णपणे धुळीस मिळवली आहे. या अभ्यासानुसार जैवविविधतेत सातत्याने घट होत राहिल्यास भारताच्या पतमानांकनात तब्बल चार श्रेणींची घसरण होऊ शकते आणि देशाला दरवर्षी सुमारे ४९ अब्ज डॉलर्स अतिरिक्त व्याजाचा बोजा सहन करावा लागू शकतो.

ही केवळ पर्यावरणीय नव्हे; तर, आर्थिक, वित्तीय, विकासात्मक आणि राष्ट्रीय सुरक्षेचीही गंभीर चेतावणी आहे. विशेष म्हणजे या अभ्यासातील अनेक निष्कर्ष महाराष्ट्रासारख्या वेगाने शहरीकरण आणि औद्योगिकीकरण होत असलेल्या राज्यांसाठी अधिक महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे उठसूठ विकासप्रकल्पांसाठी निसर्गावर घाला घालणाऱ्या राज्यकर्त्यांनी आणि प्रशासकीय यंत्रणेने यातून तत्काळ बोध घेणे गरजेचे झाले आहे. अन्यथा, येणारा काळ आपल्यापैकी कुणालाच माफ करणार नाही. कारण आपण केवळ निसर्ग आणि जैवविविधताच संपवत नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेचाही पाया कमकुवत करीत आहोत.

''अवघ्या काही दिवसांपूर्वी आपण मोठ्या उत्साहात जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. वृक्षारोपण झाले, परिसंवाद झाले, पर्यावरण रक्षणाच्या प्रतिज्ञाही घेण्यात आल्या. त्या उत्सवाचे कवित्व अद्याप ओसरलेले नसतानाच नेचर नियतकालिकातील या संशोधनाने वास्तवाचा आरसा समोर धरला आहे. जैवविविधतेचे संरक्षण हा केवळ पर्यावरणवाद्यांचा विषय नसून देशाच्या पतमानांकनाचा, कर्जखर्चाचा आणि आर्थिक स्थैर्याचा प्रश्न बनला आहे, हा संदेश या अहवालाने दिला आहे. त्यामुळे निदान आता तरी आपण शहाणे होऊन बोध घेण्याची गरज आहे.''

*...नारायण जाधव*

# ‘‘भट मेला फितूर हरामखोरीस गेला!!!’’

३१ मे ही लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती! ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी या गावी त्यांचा जन्म झाला होता. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे होते आणि ते चौंडीचे पाटील होते. त्यांचा विवाह त्याकाळच्या रीतीप्रमाणे बालपणीच इंदूरचे मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी झाला होता. खंडेराव आणि अहिल्यादेवी या दांपत्यास मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही मुलगी असे दोन अपत्य होते.

दुर्दैवाने खंडेराव अल्पायुषी ठरले. सन १७५४ साली कुंभेर किल्ल्याच्या वेढ्यात तोफेचा गोळा लागून ते धारातीर्थी पडले. पुढे सन १७६६ मध्ये वृद्धावस्थेमुळे मल्हाररावांचाही मृत्यू झाला.

अगोदर पती आणि नंतर सासरे यांच्या निधनाने अहिल्यादेवींवर डोंगराएवढे दुःख कोसळले. त्यातच सन १७६७ मध्ये त्यांचा एकुलता एक मुलगा मालेराव याचेही दुर्दैवी निधन झाले. या तिहेरी आघाताने अहिल्यादेवी अक्षरशः उन्मळून पडल्या. यावेळी होळकरांच्या राज्याच्या दिवाणपदी ‘गंगाधर चंद्रचूड’ नावाची ब्राह्मण व्यक्ती होती. त्यांस गंगोबातात्या असेही म्हणत. अहिल्यादेवींवर आलेले हे डोंगराएवढे संकट आणि त्यातून त्यांची निर्माण झालेली बिकट अवस्था पाहून गंगोबा तात्याच्या मनात गुदगुल्या झाल्या आणि त्याने गुपचूप रघुनाथराव पेशव्यास पत्र लिहिले. त्यात म्हटले होते की, ‘‘होळकरांचे राज्य बेवारस (वारसाविना) झाले आहे, म्हणून तुम्ही मोठ्या सैन्यासह येऊन ताबा घ्या. मी तुम्हाला पूर्ण साथ देतो.’’ रघुनाथराव हा विद्यमान पेशवा थोरले माधवराव पेशवा याचा काका होता आणि स्वतःच पेशवा बनण्याचे स्वप्न पाहत होता. स्वतःचे कर्तृत्त्व गाजवण्याची व पेशवेपदावर स्वतःचा दावा मजबूत करण्याची ही उत्तम संधी आहे, असे त्याला वाटले व त्याने मोठ्या सैन्यासह होळकरांच्या राज्याकडे कूच केले.

**अहिल्यादेवीस गुप्तहेरांकरवी गंगोबातात्याची गद्दारी आणि रघुनाथरावाचे आक्रमण, या दोन्ही गोष्टी समजताच त्या प्रचंड संतापल्या. त्यांनी आपले सेनापती तुकोजी होळकर यांच्या नेतृत्वाखाली फौजेची जय्यत तयारी केली. याशिवाय ५०० निवडक महिलांना सैनिकी प्रशिक्षण देऊन एक महिला पथक तयार केले. मराठा साम्राज्यातील प्रभावशाली सरदार महादजी शिंदे, गायकवाड, रघुजी भोसले यांना मदतीसाठी पत्रे पाठवली.**

अशी जय्यत तयारी झाल्यावर त्यांनी रघुनाथराव पेशव्यास अंतिम इशारा देणारे एक पत्र लिहिले. त्यात त्या रघुनाथरावास उद्देशून म्हणतात, ‘‘भट मेला फितूर (गंगोबातात्या) हरामखोरीस गेला, परंतु मी बाई म्हणून पाहू नका. खांद्यावर भाला घेऊन उभी राहीन, तेव्हा पेशव्यांच्या दौलतीस जड जाईल. आम्ही भाटभडवी करुन राज्य कमावले नाही, आमच्या पूर्वजांनी तलवारीच्या जोरावर राज्य कमावले आहे. तुम्ही तर राज्याचे स्वामी आहात. अटकेपार झेंडा रोवणारे आहात, पण क्षिप्रा नदी उतरून अलीकडे याल, तर तलवारीला तलवार भिडेल. मी बाई आहे, माझा पराभव झाला, तर कुणी नावे ठेवणार नाही, पण तुमचा पराभव झाला, तर जग हसेल; म्हणून या लढाईच्या भरीस पडू नका!’’

रघुनाथराव हे पत्र वाचून प्रचंड घाबरला आणि खजील



**ज्याकाळात, सती प्रथेच्या नावाखाली स्त्रियांना जिवंत जाळले जात होते, त्याकाळात अहिल्यादेवींनी सती न जाता राज्य सांभाळण्याचा निर्णय घेतला. एका विधवेने राज्यकारभार करणे हा मनुस्मृती आधारित ब्राह्मणधर्माविरुद्ध किती मोठा विद्रोह होता, हे लक्षात घ्या. ज्याकाळात स्त्रियांना घराबाहेर पडण्यास बंदी होती. ज्याकाळात स्वतःला शूरवीर समजणारे राजपूत युद्धातील पराजय निश्चित होताच आपल्या समस्त स्त्रियांना जौहरच्या नावाखाली आत्मदहन करण्यास भाग पाडत होते, अशा निर्मम मध्ययुगात अहिल्यादेवींनी स्त्री-सैनिकांची पलटण तयार केली होती. अहिल्यादेवींचा हा किती आधुनिक विचार आहे...!!!**

झाला. त्याने हे युद्ध टाळण्याचा निर्णय घेतला, पण चलाखी करून आपल्या येण्याचे कारणच बदलवले. अहिल्यादेवीला लिहिलेल्या पत्रात रघुनाथराव म्हणतो, ‘‘मी मालेरावांच्या मृत्यूचे सांत्वन देण्यासाठी आलो होतो, युद्धासाठी नाही.’’

**अहिल्यादेवींनी स्मितहास्य केले. रघुनाथरावाचा कावेबाज स्वभाव त्यांनी ओळखला, पण त्यांनी मुत्सद्देगिरी दाखवत त्याला भेटण्यास परवानगी दिली. अर्थात त्यास फौजबंदीने येण्यास विरोध केला. शेवटी रघुनाथराव एकट्यानेच आला. त्याने फौजेच्या खर्चासाठी पैसे मागितले, त्यावर अहिल्यादेवींनी त्याला केवळ एक तोफ देऊन निरोप दिला. गद्दार गंगोबातात्याला अटक करण्यात आली आणि तुरुंगात पाठवण्यात आले.**

या प्रसंगातून अहिल्यादेवीच्या अंगी असलेले साहस, चातुर्य, हजरजबाबीपणा, मुत्सद्दीपणा, दूरदृष्टी इ. गुणांचा परिचय होतो.

ज्याकाळात, सती प्रथेच्या नावाखाली स्त्रियांना जिवंत जाळले जात होते, त्याकाळात अहिल्यादेवींनी सती न जाता राज्य सांभाळण्याचा निर्णय घेतला. एका विधवेने राज्यकारभार करणे हा मनुस्मृती आधारित ब्राह्मणधर्माविरुद्ध किती मोठा विद्रोह होता, हे लक्षात घ्या. ज्याकाळात स्त्रियांना घराबाहेर पडण्यास बंदी होती. ज्याकाळात स्वतःला शूरवीर समजणारे राजपूत युद्धातील पराजय निश्चित होताच आपल्या समस्त स्त्रियांना जौहरच्या नावाखाली आत्मदहन करण्यास भाग पाडत होते, अशा निर्मम मध्ययुगात अहिल्यादेवींनी स्त्री-सैनिकांची पलटण तयार केली होती. अहिल्यादेवींचा हा किती आधुनिक विचार आहे...!!! अशा महान रणरागिणीला तथा काळाच्या कितीतरी पुढे पाहणाऱ्या द्रष्ट्या राज्यकर्तीला मानाचा मुजरा..!

अशा लढावू आणि काळाच्या कितीतरी पुढे असलेल्या अहिल्यादेवीला ब्राह्मण्यवादी व्यवस्थेकडून आज दैववादी चौकटीत अडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. अहिल्यादेवीचा पुतळा कसा निर्माण केला जातो? तर हातात शिवपिंड घेतली आहे, चेहऱ्यावर उदास भाव आहेत! अशा अवतारातील दैववादी, हताश-निराश अवस्थेतल्या अहिल्यादेवी आपल्याला दाखवल्या जातात. आपल्याला अहिल्यादेवींनी फक्त मंदिरच बांधल्याचे सांगितले जाते आणि त्यांना धार्मिक चौकटीत अडकवण्याचा प्रयत्न केला जातो, पण हे अर्धसत्य आहे. अहिल्यादेवी या धार्मिक असल्या तरी धर्मवेड्या आणि श्रद्धाळू नव्हत्या. त्या अत्यंत कर्तबगार होत्या. त्यांनी विहिरी बांधल्या. घाट बांधले. जलकुंड बांधले. पुष्करणी बांधल्या. शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिले. चोर दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी काम केले.

त्यासंदर्भातील हकीकतही मोठी विस्मयकारक आणि अहिल्यादेवी काळाच्या किती पुढे होत्या याची साक्ष देणारी आहे.

होळकरांच्या राज्यात दरोडेखोर, चोर आणि लुटारूंचा उपद्रव वाढला होता. अहिल्यादेवींनी आपल्या एकुलत्या एक मुलीचे (मुक्ताबाई) जाहीर स्वयंवर घोषित केले की, ‘‘जो कोणी या दरोडेखोरांचा बंदोबस्त करेल, त्याच्याशी मुक्ताबाईचा विवाह लावला जाईल. यावेळी जात-पात, धर्म किंवा वंशाचा विचार केला जाणार नाही.’’ यावेळी यशवंतराव फणसे या भिल्ल तुकडीच्या सरदाराने चोर, दरोडेखोरांचा बंदोबस्त केला; तेव्हा अहिल्यादेवींनी आपल्या एकुलत्या एक मुलीचा विवाह यशवंतरावांशी लावून दिला. काही इतिहास संशोधक यशवंतराव फणसे यास भिल्ल मानतात तर काही त्यास हटकर धनगर मानतात. त्याची जात काहीही असली, तरी अहिल्यादेवींनी एका अत्यंत सामान्य घराण्यातील व्यक्तीशी आपल्या राजकन्येचा विवाह लावून दिला. ही बाब त्या काळाचा विचार करता काळाच्या कितीतरी पुढे होती. त्यांनी यशवंतरावाचे घराणे वा जात पाहिली नाही, तर त्याचे कर्तृत्त्व पाहिले. ही घटना अहिल्यादेवींचे महानत्व सिद्ध करण्यास पुरेशी असावी, असे मला वाटते.

तर अशा महान स्त्रीचा काल जन्मदिवस होता. त्यांच्या चरित्रातून प्रेरणा घेऊन कर्तबगार, साहसी आणि समतावादी समाज निर्माण करण्यासाठी आपण कटिबद्ध होऊ या !

अहिल्यादेवींच्या जयंतीनिमित्त सर्वांना खूप खूप मंगल कामना !!

*... **बाळासाहेब गरुड*** (BG)

*संदर्भ सूची :*

*१. कर्मयोगिनी - विजया जहागिरदार*
*२.Life and Life's Work of Shree Devi Ahilya Bai Holkar - P. V. Thombre*
*३. होळकरशाहीचा इतिहास - व्ही. व्हि. ठाकूर*

**(प्रचंड तणावात व मरणाचे कष्ट घेत सुल्झर पंप्स इं. एम्प्लॉईज् युनियनचा (SEU...सेऊ) महासचिव, आपला विनोद मोरे कालपरवाच वकिलीची परीक्षा उत्तमरित्या उत्तीर्ण झाला आणि त्या अत्यानंदाच्या क्षणीची त्याची भावनोत्कटता...त्याच्याच शब्दात खालीलप्रमाणे)**

**"सहा वर्षांचा संघर्ष... आणि आता खऱ्या लढाईची सुरुवात...!!!"**

नोव्हेंबर २०२० मध्ये निलंबन...

ऑगस्ट २०२१ मध्ये पत्नीचे यकृत प्रत्यारोपण...

कौटुंबिक, मानसिक आणि आर्थिक संकटांनी अक्षरशः वेढा घातला होता...

**एकीकडे स्वतःचा संघर्ष सुरू, दुसरीकडे 'सेऊ' संघटनेचा 'सरचिटणीस' म्हणून सर्व कामगारांच्या न्यायाच्या लढ्याची जबाबदारी आपसूकपणे खांद्यावर आली होती. या काळात औद्योगिक न्यायालये आणि कामगार न्यायालयांमध्ये असंख्य दावे दाखल झाले. माझ्यासह तब्बल ४२ सहकाऱ्यांना निलंबनाच्या आणि अन्यायाच्या विळख्यात अडकविण्यात आले. सहकाऱ्यांना गेली पाच वर्षे ना पगारवाढ ना बोनस, ना ग्रेड.... कामगारांची सतत मानसिक, शारीरिक, आर्थिक छळवणूक....ऑगस्ट २०२५ मध्ये माझ्यासहित दोन सहकाऱ्यांना नोकरीतून बडतर्फ करण्यात आले आणि त्याच आठवड्यात माझ्या वडिलांना आलेला ब्रेन-स्ट्रोक. आयुष्याने जणू एकामागून एक कठोर परीक्षा घेण्याचा निर्धारच केला होता.**

पण या सर्व काळात माझे कुटुंब, मुख्यत्वे माझ्या दोन बहिणी–त्यांचे पती, माझी धर्मपत्नी आणि सह्याद्रीसारखा खंबीर, अविचल, अजाणबाहू नेता (भाई) माझ्या पाठीशी उभा राहिला. फक्त पाठीशीच नव्हे, तर खांद्यावर हात ठेवून प्रत्येक संकटात मला आधार देत राहिला. मी खचू नये, हताश होऊ नये, परिस्थितीसमोर शरण जाऊ नये आणि चुकीचे पाऊल उचलू नये म्हणून 'भाई' यांनी माझ्यावर घारीसारखी नजर ठेवली. स्वतःच्या मुलाशी रोज जितका संवाद त्यांनी साधला नसेल त्यापेक्षा जास्त आणि सतत



माझ्याशी संवाद साधून माझ्या मानसिकतेचा अंदाज घेत राहिले... माझ्या या कुरुक्षेत्रातील लढाईत कृष्ण बनून, वडील, ज्येष्ठ बंधू आणि मित्र म्हणून सर्वच भूमिका त्यांनी पार पाडल्या...

माझी प्रत्येक अडचण – मग ती कौटुंबिक असो, आर्थिक असो किंवा मानसिक – स्वतःची समजून भाईंनी त्यावर योग्य तो मार्ग काढला. त्याचबरोबर या संघर्षाच्या आगीमध्ये माझे व्यक्तिमत्त्व अधिक प्रगल्भ, अधिक सक्षम, धीरोदत्त आणि अधिक लढवय्ये बनत आहे का??? याकडेही त्यांचे बारकाईने लक्ष होते आणि आजही आहे.

एका बाजूला संघटनेच्या जवळपास ७० केसेस, वकिलांशी चर्चा, न्यायालयीन लढाया... आणि दुसऱ्या बाजूला कामगारांचे सततचे प्रश्न, फोन, बैठका, रणनिती आणि त्यात वकिली परीक्षेच्या १० परीक्षा, प्रोजेक्ट्स आणि स्थिर मानसिकतेचा अभाव.... आज मागे वळून पाहताना अंगावर काटा येतो.

आज जे काही छोटेमोठे हे यश दिसत आहे, त्यामागे माझ्या सर्व 'सेऊ' कार्यकारिणी सदस्यांचा, संघटना सहकाऱ्यांचा, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचा, कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा, तसेच माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक शुभेच्छुकाचा सिंहाचा वाटा आहे.

मी नतमस्तक होऊन आज तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

परंतु हा शेवट नाही...

**मी तुम्हा सर्वांना ग्वाही देतो की, जोपर्यंत माझ्या प्रत्येक 'सेऊ' सहकाऱ्याला न्याय मिळत नाही, जोपर्यंत त्याच्यावर झालेल्या प्रत्येक अन्यायाची योग्य भरपाई मिळत नाही, तोपर्यंत हा लढा थांबणार नाही! सेऊचा लढा हा भारतीय कामगार विश्वातील सुवर्णाक्षरांनी कोरलेला एक 'यशस्वी' असा नवा अध्याय असेल....**

उलट... आता हा संघर्ष खऱ्या अर्थाने सुरु झाला आहे आणि तो आता अधिक तीव्र होईल...

यापुढचा प्रत्येक वार घणाघाती असेल...

प्रत्येक प्रहार वर्मी बसेल...

अन्याय करणाऱ्यांना त्यांच्या प्रत्येक कृत्याचा हिशोब द्यावाच लागेल...

जब तक तोडेंगे नही...तब तक छोडेंगे नही....

पाय कालही जमिनीवर होते आणि आजही ते जमिनीवर घट्ट रोवलेले आहेत.

जबाबदारी वाढली आहे याची पूर्ण जाणीव आहे.

तुमच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी आणि माझ्या नेत्याच्या आणि त्याच नेतृत्व स्वीकारलेल्या कामगारांच्या स्वाभिमानाच्या रक्षणासाठी मी शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहीन.

धन्यवाद...!

Actual Battle Begins Now...!

आपला स्नेहांकित,

***विनोद मोरे***

# लाडकी बहीण योजनेचा २१ हजार कोटींचा प्रश्न: जबाबदार कोण?

बातमीत म्हटल्याप्रमाणे लाडकी बहीण योजनेत ८१ लाख अपात्र महिला आहेत.

**ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ नीरज हातेकर यांच्या अभ्यासानुसार या ८१ लाख अपात्र महिलांना जवळपास २१००० कोटी रुपये या लाडकी बहीण योजनेतून देण्यात आले. आणि त्यांच्याच शब्दात सांगायचे तर महाराष्ट्राच्या २६-२७ सालच्या अंदाजपत्रकात जी ४०००० कोटींची महसुली तूट दाखवली आहे, त्यातील निम्मी तूट अपात्र महिलांना पैसे वाटल्यामुळे आली आहे.**

आता फडणवीस सांगताहेत की, या ८१ लाख अपात्र महिलांकडून पैसे वसूल केले जाणार नाहीत. पण योजनेचा गैरफायदा घेतलेल्या १४ हजार पुरुषांकडून मात्र पैसे वसूल केले जाणार आहेत.

खरं तर योजनेचा गैरफायदा हा केवळ पुरुषांनीच घेतलेला नसून ८१ लाख महिलांनीसुद्धा घेतलेलाच आहे. उगीच का त्यांना आता अपात्र ठरविले?

आणि त्यांच्याहूनही जास्त गैरफायदा त्या १६४ आमदारांनी घेतलेला आहे, ज्यांनी एकनाथ शिंदे सरकारला तेव्हा पाठिंबा दिला आणि त्यामुळेच शिंदेंनी ही लाडकी बहीण योजना महाराष्ट्राच्या माथ्यावर मारली.

त्यामुळे अपात्र महिलांवर खर्च केलेले २१००० कोटी इतके पैसे वसूल करायचे; तर, १६४ आमदारांकडून वसूल करायला पाहिजेत. फार नाही, प्रत्येक आमदाराकडून फक्त १२८ कोटी इतकीच रक्कम वसूल करावी लागेल!

इथल्या स्वयंसेवी संस्था, नागरी संघटना, पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते यांनीच पुढाकार घेऊन या योजनेतील पैशांच्या गैरवाटपाविरोधात न्यायालयात जनहित याचिका दाखल करायला हवी, शासनाला न्यायालयात खेचायला हवे.

कारण या लाडकी बहीण योजनेच्या पैसेवाटपात ८१ लाख महिलांना शासनानेच आता अपात्र ठरविले आहे. त्यामुळे या योजनेत गैरप्रकार झालेला आहे, हे शासनानेच मान्य केले असल्याचा आणखी कुठला मोठा पुरावा हवाय?

**न्यायालये काय पद्धतीचे निकाल आता देत आहेत हे सर्वश्रुत असले, तरीही केवळ सत्ता मिळवण्यासाठी महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचे कोट्यवधी रुपये अशाप्रकारे उधळणे याची तुम्हाला शरम वाटली पाहिजे, हे फडणवीस आणि मिंधे गटाला न्यायालयात उभं राहून जाहीरपणे सांगायला हवे.**

***...आनंद भंडारे***

# भक्त नव्हेत मूर्ख, ते भ्रमनिरास झालेले नागरिक आहेत...



सोशल मीडियावर सतत भक्तलोक मूर्ख आहेत, त्यांना अक्कल नाही, त्यांनी मेंदू गहाण ठेवलाय वगैरे बोलत असणाऱ्या माणसांची मला दया येते..

कदाचित हे त्यांचं १२ वर्षांचं फ्रस्ट्रेशन असावं..

कोणी सांगितलं भक्तलोक किंवा BJP सपोर्टर्स मूर्ख आहेत?

ते अजिबात मूर्ख नाहीत. कितीतरी उच्चशिक्षित आहेत. देशात काय चाललंय, हे त्यांना बरोबर ठाऊक आहे.

**महागाई कशी वाढतेय रुपयाचं अवमूल्यन का होतंय.. मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री कशी खड्ड्यात गेलीय, परदेशी गुंतवणूक कशी रोडावली, जगात भारताची काय इमेज आहे**

**भारताला अमेरिका आणि इस्रायल कसे नाचवत आहेत, ब्लॅकमेल करत आहेत, रशिया आणि इराण दूर गेल्यामुळे आपलं ऑईल कसं महागलं आहे, क्रूड कमी असताना पेट्रोलचे दर कमी न करता आपल्याला कसं लुटलं गेलं आहे,.**

देशावरचं कर्ज अडीचपट कसं झालं, श्रीमंतांवरचे कर कसे कमी केले गेले, सगळे भ्रष्टाचारी भाजपमध्ये कसे घुसले, फक्त विरोधकांवरच धाडी कशा पडतात,

पत्रकारिता, न्यायव्यवस्था कशी पोखरली गेलीय, निवडणुका कशा मॅनेज केल्या जातात...

सगळं अडाणीच्या घशात कसं घातलं जातंय, त्यांना वाचवण्यासाठी सरकार ब्लॅकमेल होतंय, बलात्काराचे आरोप असलेले सरकारमध्ये उजळमाथ्याने आहेत

त्यांना सगळं कळतंय...

या सगळ्याचा फटका त्यांना पण आपल्याएवढाच बसतोय.

राहुल गांधीला वरून कितीही शिव्या दिल्या, तरी **he talks sense** आणि काही दिवसांनी त्याची भाकितं खरी ठरतात हे बघताना त्यांना खूप त्रास होत असेल. म्हणून हल्ली त्याला पप्पू म्हणणं बंद झालंय...

आपल्या मुलाने चिटिंग करून परीक्षेत यश मिळवलं; तर, लोकांसमोर आव आणता येईल; पण घराच्या चार भिंतीत आपला मुलगा ढ तर आहेच, पण सोबत खोटारडा पण आहे, याची बोचणी राहतेच

**आयटी सेलकडून आलेल्या ज्या फॉरवर्ड्स पुढे पाठवून ते इतरांना प्रतिवाद करतात, त्यातल्या नव्वद टक्के पोस्ट या फेक न्यूज असतात हे एव्हाना त्यांना माहीत झालं आहे. आपण तर फॅक्ट–चेक करतो; पण ते विश्वास ठेवतात. आयटी सेल आपल्याला नाही तर त्यांनाच चुत्या बनवतंय हे त्यांना बोचत असणार. मुळात आपल्याला फेक न्यूज कराव्या लागतात याचीच बोचणी असणार.**

इतकी वर्षे केलेली गॅस, पेट्रोल दरवाढ, महागाई, भ्रष्टाचार यांची आंदोलनं आठवत असतील...

आता बोललं तर आपलेच जातभाई आपल्याला टोचून मारतील ही भीती आहे. सगळ्या गोष्टी कोणाच्या फायद्यासाठी होत आहेत, स्वामी, मधू किश्वर यांचे इंटरव्ह्यू ते पण बघत असतील

चहा विकणे.. मगर पकडणे ते एमएची डिग्री यातलं किती खरं किती खोटं हे समजण्याची सारासार विचारबुद्धी त्यांच्याकडे आहे

त्यांचा इतिहास, सायन्स, मॅथ्स यांचा अभ्यास दांडगा आहे...

खोटा इतिहास, सायन्सची खिल्ली उडवणे, (a+b)ऑ ची काय वाट लावलीये ते त्यांना कळतं, रडार आणि ढग, गटार गॅस वगैरे ऐकून ते पण कपाळावर हात मारून घेतात

स्वातंत्र्यानंतर साठ दशकं सत्ता न मिळालेल्या काँग्रेसविरोधी विचारांची ही आजची तिसरी–चौथी पिढी आहे. पिढ्यानपिढ्या त्यांच्या घरा–घरात हे आहे. वाजपेयींचं सरकार डळमळीत होतं. मोदींचं सरकार बहुमताचं होतं. साठ–सत्तर वर्षे वाट बघितली होती... पक्षबदल, निष्ठाबदल न करता वाट बघितली होती... ती संपूर्ण सत्ता मिळवून देणारा माणूस त्यांना सुपरमॅन वाटतो, यात चुकीचं नाही.

दहा वर्षांनी जे झालंय ते पाहून आता हळूहळू त्यांचा भ्रमनिरास होतोय...

ते हल्ली शांत झालेत. बालिश बडबड ऐकून ते गप्प होतात. त्यांच्या मुलांचं भविष्य पण धोक्यात आहे, त्यांना पण आर्थिक विवंचना आहेत...

ज्याला आपण सर्वशक्तिमान परमेश्वर राजा मानलं तो शेवटी लाकडाचा ओंडका निघाला हे मान्य करायला त्रास होतोय.

**मनमोहनसिंग ज्यांची खिल्ली उडवली तो खरं तर साधा, सज्जन आणि अतिशय हुशार माणूस होता याची आठवण त्यांनाही येत असते**

**डोनाल्ड ट्रंप जेव्हा मोदींचा अपमान करत असतात, त्यांना बोटाच्या इशाऱ्यावर नाचवतात तेव्हा त्यांना अतीव वेदना होत असणार...**

**भारताला कोणाकडून काय घ्यायचं याची परवानगी अमेरिकेकडून घ्यावी लागते? मोदी हे सगळं मान खाली घालून ऐकतात पण का?**

एपस्टीन फाईल्समध्ये काँग्रेसमधल्या कोणाची नावं नाहीत; पण या सरकारच्या जवळच्या लोकांची नावं आहेत याची कुजबूज त्यांच्या कानावर पण पडत असते.

सगळी हुशार, विद्वान माणसं एक–एक करून बाजूला सारली गेली आणि फक्त चाटूकार उरलेत. निष्ठावंत सतरंज्याच उचलतात, हे ते पण बघत असतात.

मोदी नाही तर कोण? हा प्रश्न आपल्यापेक्षा त्यांच्याकरता जास्त मोठा आहे.

मनमोहनसिंग सरकारविरोधातल्या अण्णा आंदोलनात आपणही सहभागी होतो आणि २०१४ ला मोदींना पंतप्रधान बनवण्यात आपलंही मत होतं हे माहीत असल्याने ते आपल्याला अर्बन नक्षलवादी म्हणू शकत नाहीत.

लूट रहा है जिगर, पड रहा है मगर, मुस्कुराना हाय हाय ये जालिम जमाना अशी त्यांची अवस्था झाली आहे

Just leave them alone...

यशोधन वर्तक यांच्या वॉलवरून:



# ‘‘जेन–झीचा असंतोष : व्यवस्थेसमोरील नवे आव्हान’’

‘कॉकरोच जनता पार्टी’चा प्लॅटफॉर्म एका रात्रीत तयार झाल्यानंतर देशातील तरुण पिढीने लाखोंच्या संख्येने फक्त, काही दिवसातच त्यावर फॉलोअर्स बनून निषेध नोंदवला.

भाजपच्या केंद्रातील सरकारला शेजारच्या देशातील ‘‘जेन–झी’’ने सत्ताधारी पक्षास पायउतार व्हायला लावल्याचे आठवले आणि नर्व्हस होऊन त्यांनी ‘सीजेपी’च्या सोशल मीडिया हँडलवर बंदी घातली.

जेन–झीचा असंतोष एकूणच प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धच्या त्यांच्या असंतोषातून आला आहे. आणि अर्थातच प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा असंतोष नेहमीच सत्ताधारी पक्षाविरुद्ध डायरेक्ट होत असतो. नेहमीच. त्यात गैर काहीही नाही. सलग १२ वर्षे केंद्रात सत्ता गाजवणाऱ्या पक्षाविरुद्ध तर, नक्कीच.

देशातील तरुण पिढीच्या वैफल्याला अनेक अंगे आहेत. पण, गेली अनेक वर्षे सर्व प्रकारच्या माध्यमांमुळे, जाहिराती, शिक्षण/नोकरी निमित्ताने महानगरात/शहरात गेल्यामुळे भौतिक उपभोग म्हणजे काय याची आलेली प्रचिती. यांनी चेतवलेल्या किंवा खरेतर आग लावलेल्या त्यांच्या भौतिक आकांक्षा



आणि....

त्या पूर्ण करण्यासाठी रोजगार/स्वयंरोजगार/शेतीमधून पुरेसे उत्पन्न न मिळणे, उत्पन्नातील अनियमितता, सतत वाढणारी महागाई, घरे, शिक्षण, आरोग्य यावरचे वाढते खर्च, खर्च भागवण्यासाठी कर्जे काढल्यानंतर, EMIच्या रूपाने पुन्हा खर्च वाढणे, वय होऊनदेखील लग्न करता न येणे, आपल्या वयस्कर होत चाललेल्या आईवडिलांना आपण किमान राहणीमान, आरोग्य सेवा देऊ शकत नाही, याबद्दलचा अपराधभाव (Guilt).. इत्यादी

याच्या रस्सीखेचीतून येणारे वैफल्य सर्वात धारदार वैफल्य असते...आहे!

प्रचलित भांडवलशाहीच्या चौकटीमध्ये मूलभूत विरोधाभास आहे.

त्यांनी उत्पादन केलेल्या असंख्य चीजवस्तू/सेवा त्यांनी ठरवलेल्या किमतीला कोट्यवधी सामान्य ग्राहकांनी विकत घ्याव्यात, यासाठी ते प्रचंड आक्रमक मोहिमा आखतात. मुबलक कर्जे उपलब्ध करून देतात...जे आपण बघतच आहोत.

पण, या कोट्यवधी नागरिक ग्राहकांकडे त्या चीजवस्तू, सेवा बाजारभावाने (मार्केट–प्राईसला) विकत घेण्यासाठी लागणारी क्रयशक्ती, कशी तयार होणार? यासाठी लागणारे आर्थिक प्रारूप कसे तयार होणार? अशा प्रश्नांबद्दल आपण अनभिज्ञ आहोत, त्याच्याशी आपला काही संबंध नाही, असा विश्वामित्री पवित्रा ते घेतात.

प्रचलित प्रणालीतील ही ‘Structural Contradiction’ आहे. ती जोपर्यंत असेल तोपर्यंत साचणारे वैफल्य विविध मार्गांनी बाहेर येत राहील.

***...संजीव चांदोरकर***

---

# लाँग विरुद्ध शॉर्ट

## लाँग (नेटफ्लिक्स) विरुद्ध शॉर्ट (इंस्टाग्राम, टिकटॉक, यूट्यूब)

आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग असलेल्या अनेक गोष्टीत छोटे छोटे बदल होत असतात; ते कदाचित दीर्घकालीन ट्रेंडचे दिशादर्शक असू शकतात!

Netflix हा ओटीटी प्लॅटफॉर्म आपल्या ओळखीचा आहेच. या कंपनीचा शेअरचा भाव गेल्या वर्षभरात ४२ टक्यांनी खाली आला आहे; याच काळात अमेरिकन शेअर बाजार, विशेषतः Nasdaq ऐतिहासिक उंचीवर गेले होते.

फक्त काही महिन्यांपूर्वी नेटफ्लिक्स अमेरिकेत आघाडीवरच्या टेक स्टॉकमध्ये गणला जायचा.

**टीव्ही, स्मार्टफोन आणि तत्सम इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सवर दर्शक नक्की काय बघतात याचे ट्रॅकिंग ठेवणे आता कन्टेंट बनवणाऱ्या आणि आपल्या पर्यंत पोहोचवणाऱ्या कंपन्यांना सोपे झाले आहे. कारण बहुतांश उपकरणे इंटरनेटला जोडलेली असतात. दर्शकांचे प्रत्येक मिनिट ट्रॅक होते.**

कन्टेंटची लांबी किती यावरून त्याला लाँग किंवा शॉर्ट फॉरमॅट म्हणतात. आकडेवारी सांगते आहे की जमाना शॉर्ट्सचा आला आहे.

गेली अनेक वर्षे नेटफ्लिक्सचे सामर्थ्य लाँग फॉरमॅट फिल्म्सचे राहिले आहे. पण नेटफ्लिक्सच्या वर्गणीदार दर्शकांची किंवा खरेतर डोळ्यांची बुबुळे लावून बघणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. नेटफ्लिक्सच्या शेअरचा भाव खाली येण्याचे हे कारण आहे.

इन्स्टाग्रामवर तरुण जेवढा वेळ असतात त्यातील अर्धा वेळ Reels बघत असतात. टिकटॉकचे उत्पन्न गेल्या सात वर्षांत दहा पटींनी वाढले आहे. यूट्यूबवर छोट्या शॉर्ट फिल्म्स बघणारे नेटफ्लिक्सपेक्षा जास्त आहेत.

**ही सारी निरीक्षणे अमेरिकेतील आहेत. पण भारताची गाडी, विशेषतः तरुण पिढीची, त्याच रुळावरून चालली आहे. अमेरिकेला जे स्टेशन लागले ते आज ना उद्या भारतालाही लागणार आहे हे नक्की.**

मुद्दा सोशल मीडिया किंवा ओटीटी प्लॅटफॉर्म, त्यांची दर्शक संख्या, त्यांचे उत्पन्न, त्यांच्या शेअरचे भाव याच्या पलीकडचा आहे.

तरुण पिढीच्या काय पाहायचे, काय वाचायचे, काय ऐकायचे, यांचे प्राधान्यक्रम बदलत आहेत हे नक्की.



**शॉर्ट फॉरमॅटना तरुण वर्गाकडून प्राधान्य मिळत असेल तर त्याचा अर्थ कसा लावायचा? त्याचा संबंध त्यांच्या attention span शी आहे का? याचे पुढचे टोक तरुणांना सारे काही क्किक फिक्स हवे आहे इथपर्यंत जाऊन पोहोचते का? मग ते राजकीय नेतृत्व असो की त्यांचे व्यक्तिगत आयुष्य? मग मेंदूचा सकस आहार म्हणजे काय?**

साठी / सत्तरीमध्ये टीनएजमध्ये असणाऱ्या आमच्या पिढीमध्ये शाळेच्या, कॉलेजच्या दिवसात पाहिलेली पूर्ण लांबीची एखादी फिल्म, नाटक, पुस्तक पन्नास / साठ वर्षांनंतर अजूनही स्मरणात असल्याचे, आणि त्याचा आपल्या आयुष्यावर, मनावर, विचारांवर खोलवर विधायक परिणाम झाला असे सांगणारे अनेक आहेत.

हा वरकरणी वाटतो तसा तरुण पिढीचा व्यक्तिगत चॉइसपुरता मर्यादित प्रश्न नाही.

या बदलांचे भविष्यातील समाज, राष्ट्र, जग यांच्यासाठी सामाजिक, राजकीय, वैचारिक अर्थ लावण्याची गरज आहे.

***संजीव चांदोरकर***

संदर्भ : Scott Galloway Newsletter

# कॉक्रोच जनता पार्टी विचार करायला हवा.....




सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशसाहेबांनी बेकार, उपद्रवी तरुणांना झुरळ म्हटल्याचं निमित्त झालं आणि बोस्टनमध्ये बसलेल्या अभिजीत दिबके नावाच्या एका तरुणाने सोशल मीडियाच्या उतावीळ उथळपणाला साजेशी एक पोस्ट टाकली, की 'मी एक संघटना स्थापन करत आहे, कॉक्रोच जनता पार्टी. जशी भारतीय जनता पार्टी, तशी आमची कॉक्रोच जनता पार्टी. बीजेपीसारखी सीजेपी. तर आमच्यासोबत यायचं असेल, तर बेकार असायला हवं, पदवीधर असायला हवं, वगैरे.

दिबकेंच्या मनात काय किती होतं, कल्पना नाही; पण वरवर पाहता हा अगदी सोशल मीडियावरचा निरुद्योगी उद्योग वाटला. ट्रोलिंगचाच एक प्रकार जणू; पण कडवटपणात, आक्रस्ताळेपणात कमी. पुढे घडलं ते भलतंच. त्याचा टप्प्याटप्प्याने विचार करायला हवा.

**केमिस्ट्रीत 'कॅटलिस्ट' नावाचं काहीतरी असतं. हा कॅटलिस्ट हजर असल्यावर एखादी केमिकल रिॲक्शन वेगाने घडते. कॅटलिस्ट त्या रिक्शनमध्ये भाग घेत नाही; पण तो असला की रिक्शनमधल्या घटकांना एकदम चेव चढतो. याचं सोपं, केमिस्ट्रीच्या रस्त्याला जेमतेम गेलेल्यांनासुद्धा माहीत असलेलं उदाहरण म्हणजे, पोटॅशियम परमँगनेटचं विघटन. पोटॅशियम परमँगनेट गरम केलं की त्याचं विघटन होतं आणि ऑक्सिजन हळूहळू बाहेर पडतो. पण पोटॅशियम परमँगनेटमध्ये मँगनीज डायॉक्साइड घाला; या रिॲक्शनला वेग येतो. मात्र पोटॅशियम परमँगनेटचं विघटन होऊन ऑक्सिजन बाहेर पडत असताना मँगनीज डायॉक्साइड जसंच्या तसं राहतं!**

तर, कॉक्रोच जनता पार्टीची घोषणा ही जणू एक कॅटलिस्ट ठरली आणि देशभरच्या तरुणांमधला असंतोष कमालीच्या वेगाने बाहेर पडला. तो असंतोष व्यक्त करण्याचा मार्ग म्हणून तरुण सीजेपीचे सभासद होऊ लागले. किती वेगाने? अभिजीतच्या पोस्टला प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या बघता बघता भाजपच्या सोशल मीडिया सभासदसंख्येला ओलांडून गेली. हे फेसबुककर चवताळून झुरळांचे मीम्स बनवू लागले. सरन्यायाधीशांचा निषेध होऊ लागला. इतका, की त्यांना घाईघाईत "मला तसं म्हणायचं नव्हतं, माझ्या बोलण्याचा विपर्यास झाला आहे, मी खोटी पदवी दाखवणाऱ्यांबद्दल मी बोलत होतो." असा एखाद्या राजकारण्याला शोभेलसा खुलासा करावा लागला. खुद्द पंतप्रधानांच्या पदवीची शहानिशा नीट झालेली नसताना असलं काहीतरी बोलणं जरा घाईतलंच होतं.

असो. या तरुणाईचा असंतोष अर्थातच प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात होता. सर्वत्र बोकाळलेल्या भ्रष्टाचारावर राग व्यक्त होत होता. NEETसारख्या परिक्षांचे फुटलेले पेपर, हा एक राष्ट्रीय पातळीवरचा विषय समोर आला. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागितला जाऊ लागला. आजच्या काळातली चळवळ रस्त्यावर उतरून होत नाही. विशेषत: तरुणांना काहीही म्हणायचं असेल, तर ते सोशल मीडियावर जातात. तिथे प्रचंड गदारोळ उडाला. सगळं शासकीय कामकाज सुरळीत, कुठे निदर्शनं नाहीत; मोर्चे नाहीत; पण सोशल मीडियावर गोंधळ! जुन्या पिढीतल्या लोकांना जग शांत आहे, कुठे काही होतच नाही, असं वाटत असताना सोशल मीडियावरची ओळख हीच खरी ओळख, असं होऊन गेलेल्या नव्या पिढीच्या दृष्टीने सर्वत्र खळबळ! सोशल मीडियाची ताकद भाजप या पक्षाने केव्हाच ओळखली असताना ही खळबळ त्यांना न जाणवणे शक्य नव्हतं. ती जाणवल्यावर काहीच न करणे त्यांना शक्य होतं का? त्यांच्यापुढे कोणते पर्याय होते?

**सीजेपी म्हणजे केवळ एक कॅटलिस्ट, एक निमित्त, ज्याच्याद्वारे देशातल्या तरुणांमधला असंतोष बाहेर आला, सीजेपीला यापलीकडे काही प्रयोजन नाही, असं सुरुवातीला जरी वाटलं, तरी तसं राहिलेलं नाही. त्यांच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषद घेतली आहे. अभिजीत दिबके यांनी पूर्वी आम आदमी पक्षाचं काम केलं आहे, म्हणजे त्यांना राजकीय कामाचा थोडाबहुत अनुभव आहे. सध्याच्या वातावरणावरून ते केवळ 'अकॅडेमिक', म्हणजे प्रतिकात्मक कृती करून थांबतील, असं वाटत नाही. सध्या त्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदावरुन हटवण्यासाठी सरकारला आठवड्याभराची मुदत दिली आहे. पुढे ते काय करतील? पक्षीय राजकारणात उतरतील? तसे ते उतरले, तर भाजपची, म्हणजेच मोदी सरकारची भूमिका काय असेल?**

पहिला पर्याय मणिपूरच्या हिंसाचाराकडे जसं दीर्घ काळ दुर्लक्ष केलं, तसं करण्याचा. पण हे प्रकरण वेगळं होतं. मणिपूर देशाच्या एका कोपऱ्यात आहे. तिथे जे होतं, त्याचा प्रभाव देशभरच्या जनमानसावर फारसा पडत नाही, मणिपूरमध्ये दोन जमाती एकमेकांवर तुटून पडल्या आणि हिंसाचारात माणसं मरत राहिली म्हणून देशातले मतदार राज्यकर्त्या पक्षाच्या विरोधात जाणार नाहीत. आणि, मणिपुरात एखादीच लोकसभेची सीट. सीजेपीकडे ओढले जात असलेले तरुण मात्र देशभरातले. त्यांची मतं वजनदार होऊ शकतात. ते एक प्रकारे 'ओपिनियन मेकर्स' आहेत. त्यांचं ऐकून त्यांचे कुटुंबीय, मित्रमंडळी विरोधात जाऊ शकतात. ते राज्यकर्त्या पक्षाला परवडण्यासारखं नाही.

**मग भाजपने त्यांचा नेहमीचा रस्ता-शिरस्ता पकडला: खोटा प्रचार. 'सीजेपीचे बहुसंख्य सभासद भारताच्या बाहेरचे आहेत, पाकिस्तानी आहेत; सीजेपीशी संधान जुळवणे म्हणजे राष्ट्रद्रोह होय, वगैरे.' गोदी मीडिया कामाला लागला. सीजेपीला पाठिंबा देणाऱ्या शिक्षकांना अंजना कश्यप 'दो कौडी के' म्हणाली. कुठलाही चॅनेल अभिजीत दिबके किंवा कॉक्रोच जनता पार्टी यांना अनुकूल मांडणी करेनासा झाला. भाजपच्या प्रचार यंत्रणेने राहुल गांधींना जसं 'पप्पू' हे नाव दिलं, तसं काहीसं होऊ लागलं. अर्णव गोस्वामी गंभीरपणे अभिजीत दिबकेला चतुर प्रश्न विचारू लागला. देवेंद्र फडणवीस म्हणाले, जंतरमंतरवरचा प्रकार हा तरुणांचा उठाव नव्हेच; तो तर केवळ देशद्रोहच. वगैरे.**

**पुढचा प्रश्न असा की, हे पुरेसं होईल? यापलीकडे भाजप काही करणार नाही?**

ते संग्राम पाटीलसारखं अभिजीतला पकडून ठेवू शकतील. परत जायला आडकाठी करतील. संग्राम पाटील चक्क यूकेचे नागरिक आहेत. काही महिने इथे अडकून राहिल्यावर ते गेले; पण सरकारविरोधी किंवा भाजपविरोधी (यात आता काही अंतर राहिलं आहे का? देशात अजून बहुपक्षीय लोकशाही राज्यव्यवस्था आहे, या समजुतीत किती तथ्य उरलं आहे?) मत व्यक्त करत राहिल्यावर कसा त्रास होऊ शकतो, याचा एक धडा जगासमोर ठेवून गेले. आणखी एक उदाहरण सोनम वांगचुक. अनेक महिने राष्ट्रद्रोहासारख्या गंभीर आरोपाखाली त्यांना विनाजामीन अडकवून ठेवलं आणि शेवटी काहीच न करता सोडून दिलं! पण त्यातूनही हाच धडा जगाला मिळाला: 'तुम्ही दोषी ठराल, ठरणार नाही; पण तुम्हाला काही काळ गजाआड रहावं लागेल! किती काळ, हे आमच्या हातात असेल!' उमर खालिद तर... पृष्ठ क्र. १५ वर

# ''संकट तेलाचं नव्हे...तेल, हेच संकट!''

आधुनिक जगताच्या कार्बन-रसायनकेंद्री 'जीवनशैली व अर्थव्यवस्थे'च्या धारणांमुळे व धोरणांमुळे... 'जागतिक-तापमानवाढ' अनियंत्रित होत चाललेली असताना व त्यातून उद्भवलेल्या, जागतिक-तापमानवाढीच्या महासंकटांमुळे (ज्याला, 'जागतिक-हवामानबदल', असं सौम्य नामाभिधान दिलं गेलं आहे) दिवसेंदिवस असह्य होत चालल्याच्या पार्श्वभूमीवरील...५ जून-२०२६, या 'जागतिक पर्यावरणदिना'च्या निमित्ताने....

**अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यातील युद्धादरम्यान, जगभरात 'तेल-संकटा'विषयी जोरदार चर्चा सुरु असताना...आजच्या (५ जून-२०२६) 'जागतिक पर्यावरणदिना' निमित्ताने... 'जागतिक-तापमानवाढ' दिवसेंदिवस असह्य होत चालल्याच्या पार्श्वभूमीवर, आपल्याला हे जबाबदारीने समजून घेणं गरजेचं आहे की, ''संकट तेलाचं नव्हे...तर, तेल, हेच संकट आहे!''**

भांडवली-व्यवस्थेतील ऐशोआराम व चंगळवादाचं 'व्यसन' जडलेल्या मानवी समाजाची ...पृष्ठ क्र. १० वर



# इडिकॉनचा दिलीप राणे... 'धर्मराज्य'चं बावनकशी नाणे!

**...आजवर व्यक्तिशः मला किंवा 'धर्मराज्य'च्या कुठल्या पदाधिकाऱ्यांना कधिही कुठल्या स्तुतिसुमनांची-आदरसत्कारांची ओढ नव्हती आणि आजही नाही... 'मिशन' म्हणून काम करणाऱ्या कुठल्याही समाजहितैषी 'कलंदरां'साठी, ती तशी नसतेच मुळी आणि नसावी देखील! अन्यथा, हाती घेतल्या 'मिशन'वरुन (समाजसेवेचं व्रत) कार्यकर्त्यांचं लक्ष विचलीत होण्याची शक्यता, त्यात बेमालूम दडलेली रहाते.**




...पण, अनेकदा कार्यकर्त्यांचं 'माणूसपण' जपण्यासाठी आणि प्रसंगवशात, त्या माणूसपणातला त्यांच्या ओसंडून वाहणाऱ्या 'उत्साहा'चा मान राखण्यासाठी म्हणून, मानमरातबाच्या उत्सवी-सोहळ्यांना, विशिष्ट प्रसंगी मान्यता द्यावी लागणं क्रमप्राप्त ठरतं...शिवाय, त्यातून जनहीत साधलं जाणं व संघटनाकार्याचा प्रसार होणं, ही दुतर्फा शक्यता पक्ष वा संघटना नेतृत्त्वाला विचारात घ्यावी लागते.

त्यादृष्टीने पहाता, **दिलीपच्या नेतृत्त्वाखालील इडिकॉनच्या छोट्या चमूने, भरघोस पगारवाढीच्या त्रैवार्षिक-कराराप्रित्यर्थ दि. १२ एप्रिल-२०२६ रोजी पार पाडलेला सोहळा, इतका दृष्ट लागण्याएवढा उत्कृष्ट व स्वयंस्फूर्त होता.**

**इडिकॉन नावाच्या एका छोटेखानी भारतीय कंपनीचा ९५%च्या आसपास तयार माल, अमेरिकन बाजारपेठेत निर्यात होत असावा आणि ज्या कंपनीत 'अमेरिकन 'टॅरिफ वॉर'चा अपरिहार्य परिणाम म्हणून, तीन महिन्याहून अधिककाळ कंपनीत तयार माल पडून असावा आणि तेवढा काळ कंपनीतल्या कामगारांच्या हाताला काम नसावं; तरीही, परिस्थिती थोडी रुळावर येण्याची शक्यता दिसताच, कंपनीचे सहृदय मालक सर्वश्री ओब्री डिकुन्हा...आजवरच्या 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' व इडिकॉन-व्यवस्थापन, यांच्यातील दीर्घकालीन सौहार्द्रपूर्ण संबंध आणि आजवरचा समन्वय याची बूज राखून... तब्बल रु.१२,५००/- पगारवाढीचा (सरासरी पगार दरडोई रु.७६,०००/-) व लाखाच्या 'सहा आकडी' रकमेपार जाणारा बोनस (सरासरी बोनस रक्कम रु.१,२१,०००/-) रकमेचा त्रैवार्षिक-करार करते झाले, ही आश्चर्यकारक व आश्वासक बाबच!** अर्थातच, त्याचा उरभरला आनंद म्हणून, तो १२ एप्रिलचा सोहळा पार पडला; पण, त्याचवेळेस, इडिकॉन-कामगारांसमोर भाषण करताना 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चा अध्यक्ष, या नात्याने मी माझी मानसिकता प्रकट करताना सोहळ्याप्रसंगी म्हटलं की, ''आज इथे आनंदोत्सव साजरा करत असताना; माझ्या एका डोळ्यात आनंदाश्रू तर, दुसऱ्या डोळ्यात रोह्यात बेमुदत संपाच्या यातना सोसणाऱ्या 'अन्शुल केमिकल'च्या कामगारांसाठी दुःखाश्रू आहेत...''

**आमच्या दिलीप राणे व त्याच्या सहकाऱ्यांनी माझी मनोभावना केवळ अचूक जाणलीच असं नव्हे; तर, त्या भावनोत्कटतेतला प्रत्येक शब्द न् शब्द, आपल्या काळजाआड जपला...आणि, सोहळा-समाप्तीपश्चात काही दिवसातच ते रबाळे-नवी मुंबईमधून थेट रोहा-धाटावमध्ये 'अंशुल केमिकल'च्या कामगारांना भेटून आले व त्यांना मदतकर्ते झाले...यालाच म्हणतात, 'कामगारधर्म'! त्यांनी ''आनंदोत्सवातून केलेल्या कौतुक-सोहळ्यापेक्षा, या त्यांच्या उपक्रमाचं आम्हाला विशेष अप्रूप आहे''... म्हणूनच म्हणावसं वाटतं, ''इडिकॉनचा आमचा दिलीप राणे; म्हणजे, 'धर्मराज्य'चं बावनकशी नाणे!'' दिलीपच्या पावलावर पाऊल ठेवत, 'रोहेकर' असलेला हिवा-इंडियाच्या विनोद गायकवाड, कॉम्रेड शिशिर ढवळे, ॲड. नाना अहिरे व आंबेडकरी-विचारवंत तसेच लेखक आयु. आनंदाजी होवाळ हे देखील अन्शुलच्या लढ्यात समरसून योगदान देताहेत, त्याचाही आवर्जून उल्लेख व्हायला हवा.**

...गौतम बुद्धांच्या ''अत्त दीप भव'', या उक्तिनुसार ज्या इडिकॉन किंवा 'DRT अँथिया' कामगारांसारख्यांच्या अंतःकरणात 'कामगारधर्म' जागला; तर, त्यांना कुठल्या बाह्य सुर्याच्या उपस्थितीविनाच, अवतीभवती दाटलेला अंधःकार, आपल्या एकजुटीच्या ताकदीने मिटवता येतो...ते येऱ्या गबाळ्याचं काम नोहे!

इडिकॉनच्या कामगारांचाच कित्ता रोह्यातील 'DRT अँथिया'च्या कामगारांनी गिरवला व मृतप्राय झालेल्या कामगार-चळवळीत एक संजीवनी संचारली, एक सळसळ निर्माण झाली, हे निश्चितच!

हल्लीच्या काळात, बहुतेक कंपन्यांमधील कामगार व कमिट्यांमधील (व्यवस्थापनाने तिथे 'युनियन' जिवंत ठेवली असलीच तरच)... ''मी मोठा की, तू मोठा'' या 'मी पणा'च्या चाललेल्या अतिरेकी गदारोळामुळे, क्षुद्र स्वार्थबुद्धीच्या सार्वत्रिक संचारामुळे व लाजिरवाण्या स्खलनशीलतेमुळे... एकूणच कामगार-चळवळीचा श्वास गुदमरतोय; हे ध्यानात घेण्याचीही कुणाला फिकीर उरलेली नाही...मग, कुणाचं कितीही नुकसान होवो, कामगारांच्या पुढील पिढ्या कितीही बरबाद होवो; त्यांना त्यांच्या अहंपणाच्या मस्तीत त्याची क्षिती उरलेली दिसत नाही.

...अशा पार्श्वभूमीवर कामगारविश्वात 'कंत्राटी-कामगार पद्धती'च्या अवदसेच्या जोडीने, '४ काळ्या कामगार-संहितां'मधून निर्माण होऊ पहात असलेल्या अखंड गुलामगिरीच्या बिकट प्रसंगी; वरील उदाहरणे, कामगार-कर्मचारीवर्गासाठी पथदर्शक बनू पहातायत...हे ही नसे थोडके!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

**मा. एकनाथराव शिंदे,**

ठाण्यात, एका वृद्धाला हकनाक मारहाण झाल्याच्या घटनेचा, अत्यंत धक्कादायक व्हिडिओ नुकताच पाहिला आणि त्यावरील, ''शहरातील बोकाळलेल्या गुन्हेगारीवृत्तीच्या लक्षणांवरच केवळ इलाज करु पहाणारी'', आपली कडक शासन करण्याचा आदेश देणारी, पोकळ प्रतिक्रियादेखील पाहिली!

मी जन्माने ठाणेकर...तेव्हा, कोणे एकेकाळी ''सारस्वतांचं शहर असलेलं आमचं ठाणे शहर, रासवटांचं शहर कसं झालं'', ते राजकीय-गुन्हेगारी स्थित्यंतर, आम्ही लहानपणापासूनच आमच्या डोळ्यासमोर पहात आलो. जोपर्यंत, गुंडगिरीला 'राजकीय आश्रय' लाभत नव्हता; तोपर्यंतच, ती आवाक्यात होती. पण, ठाणे शहराबाहेरुन आलेल्या अनेक राजकारण्यांनी आपलं राजकारण साधताना, याच प्रवृत्तींचा मोठा आधार घेतला (त्यातले काही तर, चक्क स्वतःच पूर्वाश्रमींचे गुंडटोळीतले गुंड होते)! महाराष्ट्राच्या विविध भागांतून ठाण्यात आलेल्यांनी, काँक्रिटमधल्या काळ्या व बक्कळ कमाईसाठी आणि नितीशून्य राजकीय सत्ता-संपादनासाठी...या मुंबईला खेटून असणाऱ्या व म्हणूनच, झपाट्याने विकास पावणाऱ्या शहराचा आसरा घेतला आणि पहाता पहाता, हे 'सुसंस्कृत' शहर, गुंडांचा अड्डा बनून भयंकर अधोगतीला जाऊ लागलं. मुंबईपेक्षाही ठाणं बिघडलं... ''गुन्हेगारी, हा ठाण्यातील राजकारणाचा अत्यावश्यक व अविभाज्य




भाग बनण्याच्या, घृणास्पद घटनाक्रमालाही पाचसहा दशके उलटून गेलीत'', हे आम्ही प्रत्यक्षात फार वाईट पद्धतीने अनुभवलंय...अशा राजकीय-गुंडांचे हल्ले पचवलेत! ठाण्यातीलच एका लोकप्रतिनिधीने, शहरातील 'वीजचोरी'विरुद्ध आवाज उठवल्याबद्दल, सशस्त्र गुंड पाठवून माझा उजवा हात असलेल्या 'विक्रांत कर्णिकां'वर, काही वर्षांपूर्वी केलेला जीवघेणा हल्ला आपल्याला स्मरत असेलच... स्वतःला मोठे कार्यक्षम म्हणवणाऱ्या ठाणे-पोलिसांना, आजतागायत ते गुन्हेगार सापडू शकलेले नाहीत, ही 'राजकीय-कृपा' नेमकी कोणाची म्हणायची? ...मध्यंतरी, ठाण्यातील नामचीन गुन्हेगारांसोबत, आपले लागलेले मोठमोठे बॅनर्स, 'धर्मराज्य पक्षा'ने आवाज उठवल्यानंतरच पटापट उतरवण्यात आले होते...हे ही आपणास ज्ञात आहेच!

...तेव्हा, सदसद्विवेक बुद्धिची थोडी तरी चाड असेल; तर, मुळापासून या ठाणे शहरातील गुन्हेगारी निपटून काढायची हिंमत दाखवा...ती होणे नसेल; तर, भोळ्याभाबड्या जनतेला असे आपले गुन्हे घडल्यानंतरचे कृतिशील व्हिडिओ टाकून फसवू नका, ही नम्र विनंती...धन्यवाद!

बाय द् वे, ''आपण त्या मारहाण तरुणावर 'हत्येचा गुन्हा' दाखल करण्याचा दिलेला आदेश पूर्णतः 'बेकायदेशीर' आहे व त्यातून, दहशतवादी राजकीय-मानसिकता डोकावते'', असं म्हटलं तर चुकीचं ठरु शकेल? बदलापुरच्या अक्षय शिंदेचा एन्काऊंटर, याच राजकीय-मानसिकतेतून झाला होता... कायद्याला व कायद्यानुसार पोलिसांना, त्यांचं यथास्थित काम करु द्या, त्यांच्यावर अवांछनीय व कायदाबाह्य दबाव टाकण्याचं, आपलं राजकीय-तंत्र आवरा...''म्हातारी मेल्याचं दुःख नसतं...काळ सोकावतो आणि हाच सोकावलेला काळ, आजच्यासारख्या घटनांमधून डोकावत असतो''!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

''संकट तेलाचं नव्हे...तेल, हेच संकट!'' ...पृष्ठ क्र. ८ वरुन

जीवनशैली व अर्थव्यवहार...अवघ्या सजीवसृष्टीच्या मुळावर येत चालले असूनही; त्याकडे, आपलं अक्षम्य दुर्लक्ष होत रहावं, यापरतं दुसरं दुर्दैव काय असू शकतं?

**व्यक्तिगतस्तरावर दरडोई खनिज-तेलाचा, लोखंडाचा, सिमेंटचा (आणि, हल्ली काँप्युटर-मोबाईलचा) खप किती किंवा राष्ट्रीयस्तरावर प्रत्येक राष्ट्राचं भौतिक-संसाधनरुपी ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न (GDP) किती...हेच, आमच्या आधुनिक-प्रगतीचे 'मापदंड' बनलेत; जे मूलतः व अंतिमतः, 'जीवनविरोधी' आहेत!**

आंतरराष्ट्रीय पातळीवर नासाचे माजी संचालक जेम्स हॅन्सेन ("Storms of My Grandchildren" पुस्तकाचे लेखक) आणि आपल्या देशात, 'भारतीय पर्यावरण-चळवळी'चे जनक ड. गिरीश राऊतांसारखे अनेक पर्यावरणतज्ज्ञ... ''पृथ्वी, ही नोकरी देण्यासाठी नाही, धंदा-व्यवसाय-करियर फुलविण्यासाठी नाही; तर, फक्त आणि फक्त, आदिम-नैसर्गिक स्वरुपात निखळ आनंदाने जगण्यासाठी आहे'', असं गर्जून व तळमळून सांगत असतानाही, आपली अवस्था म. गांधींच्या तीन माकडांसारखी 'आंधळी, बहिरी व मुकी' अशी का व्हावी? ''कार्बन ओकणारी मोटरगाडी नव्हे; तर, पशुऊर्जेवर चालणारी बैलगाडी...हेच, शाश्वत-विकासाचं प्रारुप आहे'', इतकी प्रत्ययकारी व आजच्या घटकेला धक्कादायक वाटणारी मांडणी, जगभरातील पर्यावरणतज्ज्ञ करत असताना; पिसाटल्यासारखं अवघं जग, 'कार्बनकेंद्री-विकासा'च्या मागे धावत सुटलंय; हा पुढील पिढ्यांसाठी धोक्याचा 'लाल बावटा' आहे.

**'मनुष्य व पशू ऊर्जे'चाच जीवन जगण्यासाठी प्रामुख्याने वापर करणं आणि लाकूड, पाणी, माती, वनस्पती, प्राणी या नैसर्गिक-संसाधनांचाच कौशल्याने व निसर्ग-पर्यावरणाची पुनरपि सहजी भरुन निघेल, एवढीच मर्यादित हानी करुन, जगण्याची कला व कलेतला आनंद साधण्याची गरज व आव्हान, आपल्यापुढे असताना...आपण, मर्कटांसारखं बेफाम व बेजबाबदारीने वागत, निसर्ग-पर्यावरणाचा विध्वंस करत सुटलोत. आपल्या प्रदुषणकारी जगण्याच्या, या विनाशकारी घटनाक्रमाला पुरती तीन शतकं देखील झालेली नसताना, जर 'जागतिक-तापमानवाढी'तून निसर्गाचा एवढा प्रकोप निर्माण होत असेल; तर, मग थबकून आपण कुठे चाललोयत, याचा आपल्या नातवंडांच्या-पंतवंडांच्या व पुढील पिढ्यापिढ्यांच्या अस्तित्वाच्या दृष्टीकोनातून, आपण गांभीर्याने विचार करायला नको?**

भारतापुरतं बोलायचं तर... 'अनियंत्रित' कार्बन-ऊत्सर्जन करणाऱ्या 'विकासा'च्या नादाने खुळावून, 'विनाशपुरुष' ('विकासपुरुष' नव्हेच) बनलेली आपली मोदी-गडकरी-फडणवीस-शिंदे इ. राजकारणी मंडळी, गौतम अदानीसारखे भांडवलदार व संबंधित शासकिय अधिकारीवर्ग... बुलेट ट्रेन, मेट्रो रेल्वे, गगनचुंबी इमारती, विस्तीर्ण महामार्गांचं जाळं, खाणकाम... इत्यादींसाठी, मुंबई आरे कॉलनी, झारखंड तसेच छत्तीसगडच्या हसदेव मधील जंगलावर व अरवली पर्वतरांगांच्या निसर्गावर आक्रमण करताना...ते थेट ग्रेट निकोबारमधील लाखो महाकाय पुराण-वृक्षांवर कुऱ्हाड चालवताना पहावं लागणं... हे आपलं फार मोठं दुर्दैव आहे. पण, ज्यांच्यासाठी 'पैसा हाच परमेश्वर' बनलाय आणि ज्यांना 'सत्तासुंदरी'नं वेडपिसं करुन सोडलंय... अशा वखवखलेल्या वृत्तीच्या वरपांगी 'हिंदुत्ववादी'; पण, खऱ्याअर्थाने, औषधालाही 'धार्मिक' नसलेल्यांना, ते काय आणि कसं आकळणार? आपल्या भारतीय-अध्यात्मातल्या कुठल्याही एका ग्रंथात, अशातऱ्हेच्या विनाशकारी विकास-प्रक्रियेचा ओझरता तरी उल्लेख, ही तथाकथित 'हिंदुत्ववादी' मंडळी दाखवू शकतील??

**''अवघी चराचर सृष्टी, हीच परमात्म्याचंच प्रकट रुप आहे, आपण 'निसर्गप्रेमी' नसून निसर्गाचंच एक अपत्य, त्याचंच अविभाज्य अंग व त्याचाच आविष्कार आहोत''... पण, निसर्गाहून स्वतःला श्रेष्ठ समजण्यातून येणारे... कार्बन, रासायनिक, आण्विक 'प्रदूषणकारी' महाकाय-प्रकल्प म्हणजे, विकासाच्या गोंडस नावाखाली, रौद्रभीषण भविष्याची नांदी असलेलं, निसर्गाशी मांडलेलं 'द्यूत'च... जे 'भांडवली-व्यवस्थे'चं अटळ-अनिवार्य असं अपत्य आहे; ज्याला हे उमगलं, त्याच्यासाठी 'निसर्ग' हा धर्म व 'पर्यावरण' ही जात बनून जाते... दुसरंतिसरं काहीही शिल्लक रहात नाही!**

''अनाकलनीय स्वरुपाचे हवामानातील तीव्र व घातकी बदल, हे गेल्या हजारो वर्षांतील मनुष्यजाती समोरचं सर्वात मोठं आव्हान व धोक्याचा कंदील आहे...तेव्हा, काँक्रिटच्या कार्बनकेंद्री 'विकास' नांवाच्या भुतानं झपाटलेल्या मराठी-तरुणाईनं, याबाबत अनभिज्ञ राहून कसं चालेलं? तेव्हा, उठा... ''ठेविले अनंते तैसेचि रहावे...चित्ती असू द्यावे समाधान'', या संत तुकारामांच्या मराठमोळ्या वचनाला आपण जागूया!

**''जगा, जगवा आणि जगू द्या'', हाच आपला जीवनमंत्र होऊ द्या... निसर्ग हाच आपला 'धर्म' आणि 'पर्यावरण' हीच आपली जात, होऊ द्या!**

काँक्रिटचा 'विकास' नांवाचा अनर्थकारी 'विकार' जडलेल्या मूढांना, हे प्रतिपादन त्याज्य वाटणं स्वाभाविक आहे; पण, त्याने नजिकच्या भविष्यात होऊ घातलेला मानवासह सजीवसृष्टीचा संहार थांबणं केवळ अशक्य आहे! उणीपुरी काही दशकं मानवजातीच्या हातात आहेत.तेवढ्यात काही पावलं धोरणकर्त्यांनी, भारतासह जागतिक पातळीवर उचलली नाहीत; तर, आजची 'भिती' उद्याचं 'भविष्य' ठरेल तेव्हा कुठलाही उपाय मानवजातीच्या हाती शिल्लक राहीलेला नसेल, हा या आजच्या पर्यावरणदिनाचा भयकारी संदेश आहे!!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...
भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही
'हरित-पक्ष'...The First 'Green-Political Party' Of India)

# हुकूमशाही कारभार, भ्रष्टाचार आणि अन्यायाप्रति संवेदनशून्य असणाऱ्या रावणासारख्या उन्मत्त व 'माजवादी' राजकीय-व्यवस्थेविरोधात उसळणाऱ्या...'अभिजीत दिपके'सह भारतवर्षातील समस्त तरुणाईला 'अराजकवादी' ठरवणारे, देवेंद्र फडणवीस कोण...???

भारतीय संविधान आणि संविधानाअंतर्गत येणाऱ्या निवडणूक-आयोगासह सगळ्याच संस्था (अगदी बहुतांश न्यायालयीन-व्यवस्थासुद्धा) आपल्या राक्षसी पकडीत ठेवणाऱ्या...सत्तेच्या 'माजवाद्यां'नीच, देशात लोकशाहीला जिवंत ठेऊ पहाणाऱ्या भारतीय तरुणाईला 'अराजकवादी' ठरवावं...हा एक धक्कादायक क्रूर विनोद आहे आणि त्याचा सर्व थरातून तीव्र निषेध झालाच पाहिजे. कारण, एव्हाना पडद्याआड कारस्थानं रचणं सुरु झालं असेल...त्या GEN-Z तरुणाईला 'अर्बन नक्षलाईट' ठरवत, 'उमर खालिद'सारखी 'उम्रकैद' देण्याची तयारी सुरु झाली असेल किंवा गडचिरोलीतील नक्षलवाद्यांसारखी गोळ्या घालून मारण्याची तयारी सुरु झाली असेल. 'कारस्थानी' फडणवीसांनी त्याकामी, महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा अधिनियमाची (Maharashtra Special Public Security Act)...याअगोदरच, तरतूद करुन ठेवलेली आहे, हे ध्यानात घ्या.

...विशेष बाब म्हणजे, ''ये क्या लगाया है आंबेडकर आंबेडकर...आंबेडकर का नाम लेने की आजकल 'फॅशन' हो गयी है'', असं संसदेत उद्दामपणे उच्चारणाऱ्या अमित शहांची थुंकी वरचेवर झेलणार्यांना, काय कळणार की, 'आंबेडकर' ही 'फॅशन' (Fashion) नसून संपूर्ण भारतीय समाजाची व अर्थातच, आजच्या तरुणाईची 'पॅशन' (Passion) आहे! अंतरंगी आंबेडकरांचा, मुस्लिमांसारखाच व कामगार-शेतकऱ्यांसारखाच द्वेष बाळगणाऱ्या 'भांडवली-दलालां'नी...बाबासाहेब आंबेडकरांविषयी पुतना मावशीचं प्रेम दाखवावं...???

.ज्यांच्या प्रज्ञेची झेप व राजकीय समज, 'संघीय भडभुंजे आदेश' पाळण्यापलिकडे व निसर्ग-पर्यावरणाचा पार विध्वंस करत, विकासाची सैतानी-संकल्पना राबवण्यापलिकडे जात नसावी...अशांनीच, राज्यघटनेच्या सुरक्षेविषयी कोल्हेकुई करावी? ...आणि, आमच्या तरुणाईवर 'अराजकवादी' असण्याचा शिक्का मारण्याचा घोर प्रमाद करावा?? ...याचा अर्थच मुळी, गौतम बुद्धाला नववा अवतार ठरवून संपवण्यासारखं, हे या तरुणाईबाबत 'संघीय-कारस्थान' खात्रीने रचलं आहे!

...यांच्या पूर्वसुरींनी, अशीच हाकाटी करुन गौतम बुद्धाला 'नववा अवतार' ठरवला होता. जर चांगल्या अर्थाने व मनाने ठरवलाच होता; तर, मग राम-कृष्ण या अवतारांची जशी शब्दशः लाखो मंदिरे देशभरात उभारली गेली (अजूनही अयोध्येप्रमाणे नव्याने उभारली जातायत)...तशी, 'गौतम बुद्ध' या 'नवव्या अवतारा'ची किमान नऊ मंदिरे तरी या वर्णवर्चस्ववाद्यांनी उभारायला हवी होती; नऊ सोडाच, एकही असं मंदिर न उभारलं जाण्यामागचं कारण, मोठं कारस्थानीवृत्तीने आरपार भरलेलं आहे.

...त्यामागचं पहिलं सूत्र हे की, गौतम बुद्ध अल्पावधीत एवढे भरतवर्षात लोकप्रिय झाले होते की, त्यांना आव्हान देण्याची ताकद, या अल्पमती-षडयंत्री वर्णवर्चस्ववाद्यांकडे तेव्हा नव्हती; म्हणून प्रबळ शत्रूला आपला मित्र वा तारणहार जाहीर करायचा (इथे 'नववा अवतार' जाहीर केलं गेलं)....

...त्या कारस्थानातलं दुसरं सूत्र म्हणजे, भाकड कथा रचायची व जनमानसात प्रचलित करायची...ती अशी की, तत्कालीन सतयुगी गुणधर्मांमुळे कुणीच नरकात जात नव्हते व अशारितीने, रिकाम्या पडत चाललेल्या 'नरका'त पाप्यांची भरती व्हावी व आपल्याला काम मिळावं...या यमदुतांच्या विनंतीला मान देऊन विष्णूंनी गौतम बुद्ध हा म्हणे, लोकांना कर्मकांडापासून दूर नेऊन (जे प्रत्यक्षात खरंतरं महान 'पुण्यकर्म' होतं) त्यांना 'पापी' बनवण्यासाठी 'नववा अवतार'





धारण केला... मग, अर्थातच म्हणे, गौतम बुद्धांच्या नवव्या अवतारामुळे पृथ्वीवरील पापाचरण वाढून नरकात प्रचंड भरती सुरु झाली व 'बेकार' असलेल्या यमदुतांना 'रोजगार' मिळाला! परंपरेने एकेक काय यांच्या कारस्थानी डोक्यातून काल्पनिक-कथा निघतील, त्याचा थांग लागणं कठीणच. त्यामुळेच, गौतम बुद्धांची मंदिर उभारण्याचा पत्ता तर परस्पर 'कट' झालाच; पण, त्याचबरोबर, अज्ञानी बहुजनसमाजातून गौतम बुद्धांसारख्या हजारो वर्षांनी जन्म घेणाऱ्या महान व्यक्तित्वाचा, आपसूकच पाणउतारा व यथावकाश पूर्णतः पाडाव करण्यात आला! इथे लक्षणीय बाब ही की, राम-कृष्ण अवतारातला, 'राम' हा 'अपूर्ण अवतार'; तर, कृष्ण हा 'पूर्ण अवतार'... राम हा अत्यंत वात्सल्यपूर्ण व एकवचनी-सत्यवचनी; पण, मूलतः या 'अपूर्ण अवतारा'च्या, मूळ वत्सलतेनं ओतप्रोत भरलेल्या स्वभावप्रकृती विरोधात असणारा उग्रप्रकृती-रागीट स्वभावाचा राम जाणिवपूर्वक रंगवला जातोय... 'जय सिताराम' या प्रेमळ पारंपारिक उच्चाराऐवजी, 'जय श्रीराम' असा 'उग्र जप' यांच्या मुखातून सदैव केला जातोय, हे विसरु नका! तसेच, राजकीय-व्यवहारात 'सत्यवचनी' रामाची विडंबना करत, सातत्याने रेटून खोटं बोलणारी, ही भाजप-संघीय मग्रूर जमात आहे, हे ही विसरुन चालणार नाही.

...तेव्हा, देशात सद्यस्थितीत माजलेल्या एकूण 'अराजका'विरुद्ध, लोकशाही मार्गाने आवाज उठवू पहाणाऱ्या, तरुणाईला संपवण्याचं भाजप-संघीय 'कारस्थान', अशातऱ्हेनं सुरु झालं असेल; तर, राहुल गांधींच्या नेतृत्त्वाखालील 'कॉंग्रेस आणि कॉक्रोच'...यांनी एकमेकात पूर्णतया मिसळलं जाणं, ही काळाची गरज; तसेच, या भीषण काळाची ती हाक आहे...फक्त, ती संबंधितांच्या कानापर्यंत, मेंदूपर्यंत पोहोचली पाहिजे व त्यावर, त्यांनी तातडीने सजग होऊन सकारात्मक विचार करायला हवा.

भाजप-संघीय नजरेत (सरन्यायाधीश वा CJI त्याच विचारधारेचे) 'झुरळं आणि बांडगुळं' असलेली तरुणाई (जी प्रत्यक्षात, देशाचं भविष्य आहे)...म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरु, भगतसिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर... या चार महान प्रभृतींच्या विचार-वारशाला सोबत घेऊनच, आपली राजकीय पाऊलवाट चोखाळत असेल; तर, त्यांनी हकनाक वेगळी राजकीय चूल मांडून आपला वेळ व ऊर्जा निष्कारण खर्ची पाडू नये! राहुल गांधीं, हे आजच्या घटकेला, वरील चौघा राष्ट्रीय-नेत्यांचं, जाज्वल्य प्रतिनिधित्व करताहेत, हे या GEN-Z तरुणाईनं आवर्जून समजून घ्यायला हवं!

राहुल गांधींना सद्यस्थितीत अशा विचारशील, उत्तम राजकीय आकलन असणाऱ्या समाजहितैषी-सुशिक्षित नवतरुणांची नितांत गरज आहे... राहुल गांधींनीही, स्वतः पुढाकार घेऊन, या साऱ्या तरुणांना कॉंग्रेसमध्ये आग्रहपूर्वक बोलवावं व मोठ्याप्रमाणावर त्यांना कॉंग्रेसमध्ये, महत्त्वपूर्ण पदांवर, वेळ न गमावता (कन्हैय्या कुमारप्रमाणे) नेमावं व जागा अडवून बसलेल्या कॉंग्रेसी दुढ्ढाचार्यांना लवकरात लवकर सोडचिठ्ठी द्यावी! या सगळ्या मंथनातून, कॉंग्रेसला आपली स्वातंत्र्यपूर्व काळातील जुनी ओळख (Identity) पुन्हा प्राप्त होईल व देशाचं त्यातून नक्कीच चांगभलं होईल.

...तशीही झुरळं, ही किटकांची प्रजात, अत्यंत प्रतिकूल पर्यावरणीय स्थितीतही टिकून-टिच्चून राहू शकतात; ती त्यांची क्षमता एवढी अचंबित करणारी की, भविष्यात आण्विक युद्धाने जगाचा पूर्ण विनाश झाला, तरी झुरळं त्या आण्विक-विकिरणाच्या भयंकर प्रदुषणातही वाचणार आहेत आणि नुसती वाचणार नव्हेत; तर, त्यांचा आकार व संख्या कमालीची वाढणार आहे, असं म्हटलं जातं...

तसंही, 'माणूस आणि झुरळं', यांचं एक अनोखं नातं आहे; ते सैबेरिया-ग्रीनलॅंडसारख्या अतिशीत प्रदेशातही एकत्र दिसतात-रहातात आणि अरबस्तानाच्या अतिउष्ण वाळवंटी-प्रदेशातही... ''जिथे माणूस, तिथे झुरळं'', हे एक समीकरणच!

...तोच प्रत्यय, 'कॉंग्रेस आणि कॉक्रोच', यांच्या सहअस्तित्वाच्या व विलिनीकरणाच्या रुपाने यावा; आजच्या लोकशाहीच्या दृष्टीकोनातून अत्यंत प्रतिकूल असलेल्या धोकादायक काळात, तो झुरळांसारखाच कुठल्याही वातावरणात टिकून-टिच्चून रहावा, हीच ईशचरणी प्रार्थना...जय हो!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ''करामती झुरळ जनता पार्टी स्वाभिमानाने उठली कार्टी....''

*... ज्ञानेश महाराव (ज्येष्ठ पत्रकार-संपादक)*

सरन्यायाधीशांनी बेरोजगार तरुणाईच्या जिव्हारी लागणारी हेटाळणी केली. त्या जखमेवर ''नीट'' परीक्षेच्या पेपरफुटीचं मीठ पडलं. यातून हिंगोलीच्या अभिजित दिपके या तरुणाने ''कॉक्रोच जनता पार्टी'' जन्माला घातली. गमतीचा हा मामला ''मोदी सरकार''ने गंभीरपणे का घेतलाय ?

**देशाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका प्रकरणाच्या सुनावणीत, बेरोजगार तरुणाईला ''कॉक्रोच'' (झुरळं) आणि पॅरासाईट (बांडगुळं) अशा उपमा दिल्या. ते म्हणाले, ''ही मंडळी 'माहिती अधिकारा'चा आणि 'सोशल मीडिया'चा (इन्फ्लुएन्सर म्हणून) वापर करुन आंदोलनं पेटवतात. देशापुढे धोका निर्माण करतात.'' सूर्यकांत हे देशाचे सरन्यायाधीश असले तरी, सत्ताधीशाला ''तू गुन्हेगार आहेस; तुला देहान्ताशिवाय दुसरे प्रायश्चित नाही,'' असे ठणकावून सांगणाऱ्या पेशवाईतल्या रामशास्त्री प्रभुणे यांचे अवतार अजिबात नाहीत. ''हरामशास्त्री'' उपाधीला साजेसा त्यांचा इतिहास आहे...तो त्यांची सहा महिन्यांपूर्वी सरन्यायाधीश पदावर नेमणूक झाली तेव्हा उगाळला गेला होता. त्यामुळे त्यांच्या वक्तव्यावर टीका होताच, त्यांनी ''मी फेक डिग्रीवाल्यांबद्दल बोललो (हे नेमकं कुणा सत्ताधीशाला चपखल लागू पडतं...ते सूज्ञ वाचका सांगणे न लगे)... देशातील युवकांबाबत मी आशावादी आहे'', अशी सारवासारव केली. ती पचनी पडावी, असे वर्तमान देशात तयार झाले नाही.**

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल लागताच, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दोन महिन्यापूर्वीच्या अमेरिका-इस्त्राएल आणि इराण यांच्यामधील युद्धाच्या परिणामांचा हवाला देत; ''आणीबाणी''ला साजेशा इंधन बचतीच्या आणि अन्य सूचना दिल्या. त्याने जनता खवळली. ''मोदी सरकार'' विरोधात बोलू लागली. त्यात प्रधानमंत्रींनी युरोप दौऱ्यातील नॉर्वे देशात महिला पत्रकाराच्या प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळले. ते भारतासाठी अपमानास्पद होते. ''पत्रकारिता स्वातंत्र्य''च्या यादीत नॉर्वे हा ''क्रमांक एक''चा देश आहे; तर भारत आज १५७ व्या क्रमांकावर आहे. हे चित्र बदलवण्याची संधी नरेंद्र मोदी यांना मिळाली होती. त्यांना ''आपला प्रश्न योग्य जागी विचारा,'' असं म्हणून प्रश्नकर्त्या पत्रकाराला जबाबदारीचे भान देता आले असते. पण ते प्रश्नापासून पळ काढावा, तसे सटकले. त्यांचे हे वागणे ''भारतीय पत्रकारिता'' सत्तेची शरणागत आहे; यावर शिक्कामोर्तब करणारे ठरलेय.

जागतिक स्तरावर भारताचे असे विचित्र चित्र रंगत असतानाच; वैद्यकीय (मेडिकल) शिक्षणासाठी देश पातळीवर एकमेव असलेल्या ''नीट'' (NEET) परीक्षेचे पेपर फुटले आणि ते लाखो रुपयात विकले गेल्याचे प्रकरण जाहीर झाले. वैद्यकीय पदवीसाठीच्या देशभरातील १ लाख २९ हजार ६०६ जागांसाठी देशभरातून २२ लाख विद्यार्थी या प्रवेश परीक्षेसाठी बसले होते. आरोपींची धरपकड होताच पेपर फुटीची व्यापकता स्पष्ट झाली. सरकारने परीक्षा रद्द करुन सदर परीक्षेसाठी २१ जून ही परीक्षेची तारीख जाहीर करताच, कोचिंग क्लासेसनी ''उजळणीच्या वर्गांचे पॅकेज'' जाहीर केले. दरम्यान, पुन्हा परीक्षा देण्याच्या धसक्याने तीन परीक्षार्थींनी आत्महत्या केली.

सरकारी यंत्रणा, कोचिंग क्लासेस आणि धनाढ्य पालक यांच्या संगनमताने निर्माण झालेल्या रॅकेटमधून पेपरफुटीचे प्रकरण तयार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, गेल्या आठ वर्षांत पाच वेळा आणि आता सलग तीन वर्षे ''नीट'' परीक्षेचे पेपर फुटलेत. अनेक सरकारी परीक्षांत, गेली काही वर्षं असेच घडतंय. ह्यात कसोशीने अभ्यास करणाऱ्यांचा प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता वाया जाते. 'स्पर्धेतील समान संधी' या लोकशाही मूल्यांचा पराभव होतो. गरीब परीक्षार्थी मेहनत घेऊन अभ्यास करतो; आणि श्रीमंत व्यवस्थाच विकत घेतो, अशी भावना समाजात निर्माण होणे अत्यंत धोकादायक आहे. पण, तसेच झाले आहे. अशा धोकादायक परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या तरुणाईची ''झुरळ'' किंवा ''बांडगूळ'' म्हणून हेटाळणी करणे, हे आगीत पेट्रोल टाकल्यासारखेच ठरणार!

आपल्या देशात दरवर्षी ५० लाख मुलं-मुली पदवीधर होतात. त्यांच्या नोकरी- धंद्याची कोणती व्यवस्था गेली १२ वर्षे सत्तेवर असणाऱ्या ''भाजप सरकार''ने केलीय? देशाची सत्ता मिळवण्यासाठीच्या प्रचारात ''दोन कोटी नोकऱ्या निर्माण करू,'' अशा बाता नरेंद्र मोदी आणि ''भाजप''ने मारल्या होत्या. प्रत्यक्षात नोटाबंदी, कोरोना-लॉकडाऊन आणि खाजगीकरणाच्या फटकाऱ्यात देशातील साडेतीन कोटी नोकऱ्या संपवल्या. गुणवंतांना जे हवं ते शिकण्याची संधी नाही आणि गरजवंतांच्या हाताला काम नाही! अशी स्थिती निर्माण करणाऱ्या व्यवस्थेला गुणवंत-गरजवंत बेरोजगार माहितीच्या अधिकारात जाब विचारणारच ना? कारण -

*''पोटातल्या आणि डोक्यातल्या,*
*भुकेची आग शमता शमत नाही!*
*अंधारलेल्या डोळ्यांना कधी,*
*स्वातंत्र्याचा कवडसा दिसत नाही!!*
*हक्क कशावर सांगावा,*
*तर हक्काचं काहीच नसावं!*
*संस्कृतीचं मढं मात्र,*
*रोजच्या रोज सजवावं!!''*

या कवी राहुल तूपलोंढे यांच्या कवितेतील ओळी भोवताली अनुभवायला येत असतील; बेरोजगार तरुणांपेक्षा कमी शिक्षित लोक ''मसल आणि मनी''च्या जोरावर लोकप्रतिनिधी म्हणून मिरवत असतील; तर त्यांच्या हरामखोऱ्या माहितीच्या अधिकारात का नाही उघड करायच्या? २०१४ पासून ''मोदी सरकार'' सत्तेवर आहे. त्यापूर्वी देशात ८० कोटी लोकं मोफत धान्यावर जगत होते का? सूक्ष्म व छोटे उद्योग व्यवसाय कसे बंद पडले आणि 'मॉल' व त्याच्या चेन्स उभ्या करून छोटे उद्योग, दुकानदार आणि व्यापारी कोणी उद्धस्त केले? 'एमआयडीसी' भकास का झाल्या? देशाची खनिज संपत्ती मोजक्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात कोणी घातली? (सायकलवरून फिरणारा रामदेवबाबा आज हजारो कोटी रुपयांत कोणाच्या बळावर खेळतोय? ''नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल'' (NCLT) स्थापन करुन कॉर्पोरेट कंपन्यांची २५ लाख कोटी रुपयांची कर्जमाफी करून काय साधले? फायद्यात चालणाऱ्या सरकारी कंपन्या जागेसह कॉर्पोरेट कंपन्यांना विकून किती अधिक संख्येने रोजगार निर्माण झाले? ''अॅग्रीकल्चर सेक्टर''मध्ये कॉर्पोरेट कंपन्यांना घुसवून जनतेला त्यांच्याच पैशाने ''सरकारी लाभार्थी'' बनवणे, ही चलाखी नाही का? ''पी. एम. केअर फंड''मध्ये जमा झालेल्या अब्जोवधी रुपयांचे काय झाले? असे प्रश्न सरकार वा व्यवस्थेला विचारणे, हे भारतीय नागरिकांचे देशभक्त म्हणून कर्तव्यच आहे! हे प्रश्न विचारणाऱ्याला ''झुरळ'' म्हणून झटकता येणार नाही; किंवा ''बांडगूळ'' म्हणून दुर्लक्षितही करता येणार नाही.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सारवासारव केली तरी, ते ''झुरळ'' आणि ''बांडगूळ'' हे शब्द पुसू शकले नाही. या शब्दांतून तुच्छता प्रदर्शित होते. ''ढेकणासारखे चिरडून टाकू .... झुरळासारखे झटकून टाकू,'' हे शब्दप्रयोग अधिकाराचा अतिरेकी माज दाखवणारे आहेत. ''पॅरासाईट'' ऊर्फ ''बांडगूळ'' म्हणजे परजीवी! मोठ्या झाडावर बांडगूळ उगवतं. ते परपोषित म्हणजे मूळ झाडापासून आपल्या अन्नासाठीचा जीवनरस शोषतं. यावर ते इतकं वाढतं आणि पसरतं की, त्याने मूळ झाड झाकोळून जातं. वाढती बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार आणि मानवाधिकाराची गळचेपी या समस्या मांडणारे सरन्यायाधीशांना झुरळ-बांडगुळासारखे का वाटावेत? त्याने विकसित भारताची ओळख झाकोळून जाते का? का, ''विश्वगुरुची प्रतिमा झुरळसम्राटासारखी होते? तसे असेल तर झुरळ व बांडगूळ यांची पैदास कोणाच्या नालायकीमुळे झाली, याचा अभ्यास सरन्यायाधीशांनी केला नसावा. तसेच,''तरुण पिढीबद्दल असे बोलायला नको होते,'' असे सरन्यायाधीशांना सुनावण्याची धमक ''मोदी सरकार''कडे उरली नसावी. त्यामुळेच ''कॉक्रोच जनता पार्टी''च्या माध्यमातून तरुणाईंसह जनतेचा संताप मोठ्या प्रमाणात व्यक्त झाला. याला कारण, सत्ताधारी पक्ष संसद-विधिमंडळामध्ये सत्ता बळाने विरोधकांना झुकवतात. हेच पोलीस यंत्रणा, न्यायपालिका, प्रसारमाध्यमं यातून होताना दिसते. यात दुरुस्ती होण्याऐवजी जनतेची सहनशक्ती वाढवणारे कारनामे सरकार करते, असाही अनुभव जनतेला येऊ लागलाय.

**''नीट'' परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात खैरनार, कुलकर्णी, मोटेगावकर, मांढरे, हवालदार, वाघमारे अशी आडनावं जाहीर झाली. यावर, ''यात मुस्लीम नाव असते, तर हे प्रकरण सरकारला 'पेपर लीक जिहाद' म्हणून खपवता आले असते,'' असं लोक बोलू लागलेत. याचा अर्थ, जनतेने आता ''भाजप-संघ सरकार''च्या कारभाराला पुरते ओळखले आहे! म्हणूनच झुरळ, बांडगूळ या शब्दातील तुच्छता जनतेच्या जिव्हारी लागली. हे शब्द सरन्यायाधीशांच्या तोंडून आले असल्याने, ते निश्चितच अज्ञानातून आलेले नाहीत.** या शब्दांना तुच्छतेचा इतिहास आहे. हुकूमशहा डॉल्फ हिटलर (जन्म : २० एप्रिल १८८९; मृत्यू : ३० एप्रिल १९४५) याच्या नेतृत्वाखालील जर्मनीत अति-उजवी आणि कट्टर राष्ट्रवाद जोपासणारी ''नाझीझम'' (नाझीवाद) नावाची राजकीय विचारधारा उदयास आली. हिटलर व नाझीवादी हे ''जर्मन आर्य वंश'' हा सर्वश्रेष्ठ व शुद्ध आहे,'' असं म्हणत स्वतःचा गौरव करुन घेत; आणि उर्वरित ज्यू व काळ्या रंगाच्या अल्पसंख्याकांना कनिष्ठ ठरवून तिरस्कार

करीत. त्यांना ''उंदीर'' किंवा ''बांडगूळ'' म्हणत अपमानित करीत. (जसं आजही मागास जाती-जमाती आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांना ''सरकारी जावई'' किंवा ''भीमटे'' म्हणतात तसं.) जर्मनीतल्या समस्यांचे मूळ हे ज्यू लोकच आहेत, असं ठरवून हिटलर व नाझींनी लाखो ज्यूंची क्रूरपणे हत्या केली.

असेच १९९४ च्या एप्रिल ते जुलै महिन्यात रवांडामध्ये झाले. रवांडा हा पूर्व आफ्रिकेतील छोटा विकसनशील देश! त्याच्याभोवती टांझानिया, बुरुंडी, युगांडा, काँगो हे देश आहेत. ६ एप्रिल १९९४ रोजी रवांडाचे तेव्हाचे राष्ट्रप्रमुख जुवेनल हब्यारीमाना यांचा विमान कोसळून मृत्यू झाला. ते तिथल्या ''हूतु'' (Hutu) या बहुसंख्याक जमातीचे होते. त्यांचा अपघात हा घातपात आहे, असा प्रसार ''हूतु पॉवर'' या कट्टरतावादी संघटनेने सुरू केला आणि अल्पसंख्याक असलेल्या ''तुत्सी'' (Tutsi) समाजावर हत्येचा आरोप ठेवला. त्यानंतर सरकारी यंत्रणा, सैन्य आणि ''हूतु'' नागरिकांनी मिळून १०० दिवसांत ८ लाख ''तुत्सी'' लोकांची हत्या केली. या संहारासाठी सरकारी रेडिओवरून ''तुत्सींना झुरळासारखे चेचून संपवा,'' असे उघड आवाहन करण्यात आले होते. त्यासरशी शेजारी व नातेसंबंध यांचा विचार न करता तुत्सींचे धारदार हत्यारांनी शिरकाण करण्यात आले.

भारतात असे होणार नाही; होऊही नये! अगदी श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश मधल्या ''जेन झी''च्या उद्रेकासारखेही होऊ नये. कारण, भारत हा शून्यालाही ''अर्थ''पूर्ण करणाऱ्यांचा देश आहे! प्राचीन भारतीय गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट (इ.स. ५ वे शतक) यांनी दशमान स्थान-मूल्य पद्धतीचा शोध लावताना ''शून्य''ला संख्या म्हणून मान्यता मिळवून दिली. या शून्यामुळे कितीही मोठ्या संख्या लिहिणे आणि त्यावर गणिते करणे अतिशय सोपे झाले. शून्याच्या शोधासोबतच भारताने जगाला दशमान स्थान-मूल्य पद्धतही दिलीय. या बळावरच गेल्या १२ वर्षात ''मोदी सरकार''ने भारताच्या डोक्यावरचे ''वर्ल्ड बँके''चे कर्ज कित्येक पटीने वाढवले आहे. भारत सध्या ''वर्ल्ड बँके''चा नंबर वन कर्जदार असून कर्जाची रक्कम २४९ लाख कोटी रुपये झाली आहे. होऊ दे. तर, शिवरायांनी शून्यातून इतिहास घडवला; म्हणून स्वराज्य-समता-स्वातंत्र्य-संविधान असा भारताला ''सार्वभौम राष्ट्र'' करणारा प्रवास देशाने पूर्ण केला. हा प्रवास प्रचंड संघर्षाचा आहे. त्यामुळे सरन्यायाधीशानांही बेरोजगार तरुणाईला झुरळ-बांडगूळ म्हणून तुच्छतेने वागवता येणार नाही. हेच सांगण्यासाठी २९ वर्षांच्या अभिजित दिपके याने ''कॉक्रोच जनता पार्टी''ला सोशल मीडियावर व्हायरल केलं. यातून तरुणाईचा राग एकत्र झाला आणि अवघ्या चार दिवसांत ''कॉक्रोच जनता पार्टी''च्या हँडलवरील फॉलोअर्सचा आकडा ''भाजप'' (८० लाख ७० हजार) आणि ''राष्ट्रीय काँग्रेस'' (१ कोटी ४० लाख) यांना ओलांडून २ कोटीच्यावर गेला. तुच्छतावादाला स्वाभिमानाने उत्तर दिले.

''राजा हरिश्चंद्र आणि तारामती''ची पुराण कथा आहे. हरिश्चंद्र स्वप्नात दिलेल्या वचनानुसार, ऋषी विश्वामित्राला आपले राज्य, संपत्ती आणि सर्वकाही दान करतो. पोटासाठी स्मशानातील चांडाळाकडे लाकूड फोडण्याचे काम करू लागतो. तिथेही त्याची परीक्षा सुरूच असते. जेमतेम एका भाकरीचे पीठ घेता येईल, इतकीच त्याची कमाई होते. तो थकतो, तसे त्याच्यापुढे मरण उभे ठाकते. एक भाकर तयार होईल, इतकेच पीठ शिल्लक असते. त्यातून बनवलेल्या भाकरीचे तारामती चार चतकोर करते. एक हरिश्चंद्रापुढे, एक आपल्यापुढे आणि एक बाहेर गेलेल्या रोहिदाससाठी ठेवते. एक चतकोर उरतो. तो कुणासाठी ठेवायचा, याचा विचार करते. एका दिवसाने हरिश्चंद्राचे; दोन दिवसांनी तारामतीचे; आणि तीन दिवसांनी रोहिदासचे मरण ठरलेले असते. ती हरिश्चंद्रापुढे उरलेला चतकोर ठेवू पाहते; तोच हरिश्चंद्र तिला अडवत म्हणतो, ''या जास्तीच्या चतकोराचा मला काय उपयोग? रोहिदास आपल्यापेक्षा दोन दिवस अधिक जगणार आहे. त्याच्यासाठी अधिकचा चतकोर ठेव!'' तारामतीला ते पटते. रोहिदासच्या वाट्याला दोन चतकोर होतात. तारामती म्हणते, ''मला उपासाची सवय आहे. उद्या तुम्ही जाणार, या दुःखाने मला काही खावंसं वाटत नाही!'' असं म्हणत तारामती आपल्या पुढचा चतकोर रोहिदासच्या वाट्याच्या अर्ध्या भाकरीवर ठेवते. त्याबरोबर हरिश्चंद्र म्हणतो, ''माझ्यापाठोपाठ तूही जाणार, याचं दुःख मलाही आहे. काही खावंसं वाटत नाही!'' असं म्हणत तो आपल्या चतकोराने रोहिदासच्या वाट्याची भाकर पूर्ण करतो. हा संवाद रोहिदासने आडोशाला उभे राहून ऐकलेला असतो. तो पुढे येत म्हणतो, ''आई-बाबा, तुम्ही माझ्या पोटाच्या भुकेची जितकी काळजी करता; तितकी काळजी माझ्या स्वाभिमानाची कधी करणार? माझ्या स्वाभिमानाच्या आड हे पोट येत असेल, तर हे पोट मी फेकून देतो!''

**ज्या देशात स्वाभिमानासाठी पोट फेकून देणारी तरुणाई असते; त्या देशाला भिकेचे डोहाळे लागत नाही. याचाच साक्षात्कार सध्या अमेरिकेत शिक्षणासाठी राहात असलेल्या हिंगोलीच्या अभिजित दिपके याने घडविला आहे. त्याच्या धाडसाला देशातल्या तरुणाईने भरभरून साथ दिलीय. ''कॉक्रोच जनता पार्टी''चे सोशल मीडिया हँडल त्याने गंमत म्हणून सुरू केले. त्याच्यात जे लिहिलेले, दाखवले ते उपहासात्मक आहे.** ''आळशी आणि बेरोजगार तरुणांचा आवाज'' हा त्याचा पुरावा आहे. पण त्यातून देशापुढचे गंभीर प्रश्न जगजाहीर झालेत. त्यापुढे ''अभिजित पूर्वी कुठल्या पक्षाचा प्रचारक होता? आता त्याला कोण पाठिंबा देतोय?'' हे प्रश्न निरर्थक ठरतात. त्याच्या गमतीला गंभीरपणे घेऊन त्याच्यामागे दोन राष्ट्रीय राजकीय पक्षांपेक्षा अधिक पाठीराखे उत्स्फूर्तपणे उभे राहिले; आळशी कार्टी स्वाभिमानाने उठली, हेच महत्त्वाचे आहे. उत्स्फूर्ततेला स्वतःची अशी कार्यशक्ती असते. ती आलेल्या अनुभवातून तयार होते. ती संपवणाऱ्यालाच संपवून टाकते. अशक्य ते शक्य करते.

अंधार खूप आहे. तो दूर करायचा तर प्रकाश पाहिजे. हा प्रकाश देण्याचं सामर्थ्य जर इतिहासात, जाती-धर्मवादात, संस्कृतीत, जागृत देव-देवतांत किंवा स्वतःला 'विष्णु अवतारी' म्हणवून घेणाऱ्या प्रधानमंत्रींमध्ये असते; तर अंधारच झाला नसता! म्हणून प्रकाशासाठी सामाजिक-राजकीय जाण-भान असणाऱ्यांनी अंधाराला संकट न मानता त्याचे आभार मानले पाहिजे. तरुणांसाठी ही आपलं आयुष्य प्रकाशमान करण्याची संधी आहे. उद्याची ही आशा, निराशा करणारी नसेल. कारण तरुणाईच्या बुद्धी भांडारात विज्ञान-तंत्रज्ञानाचा दिवा पेटत असेल...तो पेटला असेल; तर चर्चेत शक्ती-काळ वाया घालवण्याऐवजी थेट कामाला लागा. ऑनलाईन विचार, आचरणात आणा. भारत हा तरुणांचा देश असल्याचे दाखवून द्या!

*(प्रसिद्धी : दै. देशोन्नती आणि दै. आधुनिक केसरी; रवि. २४ मे २०२६)*

## बारा वर्षांचा लेखाजोखा....

*कुशासन.*
*चौपट कर्ज.*
*घसरता रुपया.*
*घसरलेली अर्थव्यवस्था.*
*महागाई.*
*भ्रष्टाचार.*
*अदानीकरण.*
*सरकारी कंपन्या विक्री.*
*नोटाबंदी.*
*अर्थशास्त्री परागंदा.*
*लॉकडाऊन.*
*बेरोजगारी.*
*शेतकरी आत्महत्या.*
*काटकसरीचं ढोंग.*
*पीएम केअर फंड.*
*इलेक्टोरल बाँड्स.*
*राफेल.*
*ईडीवर कब्जा.*
*सीबीआय भाजपमय.*
*लाचार आयटी.*
*आयोग झाला चाकर.*
*लॅटरल एन्ट्री.*
*जजांचे खून.*
*गोगोई राज्यसभा.*
*चंद्रचूड आरती.*

*मिठ्या.*
*हॅहॅहॅ.*
*गंडलेलं परराष्ट्रधोरण.*
*एकही राष्ट्र खरा मित्र नाही.*
*एका ट्वीटवर युद्धबंदी.*
*ट्रंपचा धाक.*
*एप्स्टीन फाईल्स.*
*अदानीची अटक.*
*मेलोनीला मेलडी.*
*रशिया तेलबंदी.*
*इराण तेलबंदी.*
*वेषांतर.*
*पंधरा लाखांचा सूट.*
*महागडे मश्रूम.*
*फोटोजीवी.*
*नावं बदलणे.*
*योजना पळवणे.*
*आत्मप्रौढी.*
*स्वमग्नता.*
*खोटेपणा.*
*दांभिकपणा.*
*फ्लेक्सबाजी.*
*सर्वत्र फक्त मी.*

*बोगस डिग्री.*
*गटार गॅस.*
*प्लास्टिक सर्जरी.*
*रडार.*
*माध्यमांचं भाजपाकरण.*
*आंबा.*
*चॅनल्सवर मालकी.*
*गोदी मीडिया.*
*अंबानी-अदानी.*
*चाटुकारिता.*
*नकली राष्ट्रवाद.*
*वंदेमातरमचा मतलबी वापर.*
*जनगणमनची असूया.*
*राष्ट्रपुरुषांची बदनामी.*
*नेहरूंचा द्वेष.*
*पटेलांची ओढाओढी.*
*सुभाषबाबूंवर पूतना प्रेम.*
*अज्ञानाचा इतिहास.*
*ऐतिहासिक अज्ञान.*
*पुलवामा.*
*पहलगाम.*
*युद्धबंदी.*
*बिर्याणी.*
*ढोंगी धर्मवाद.*
*गायगुंड.*
*मॉब लिंचिंग.*
*अखलाख.*
*रोहित वेमुला.*
*हाथरस.*
*मणिपूर.*
*झाडतोडी.*
*वनजमीन विक्री.*
*बेसुमार खाणकाम.*
*लादलेले प्रकल्प.*
*लघुउद्योगांचं मरण.*
*पक्षांतरं.*
*फोडाफोडी.*
*सत्तर हजार कोटी.*
*नॅचरली करप्ट पार्टी.*
*दिदी ओ दिदी.*
*गुवाहाटी.*
*पक्ष पळवणे.*
*धाकदपटशा.*
*सत्तालंपटता.*
*बारा वाजले...!!!*

*(समाजमाध्यमातून साभार....)*

# निसर्ग म्हणजे अर्थव्यवस्थेचा अदृश्य पाया

जगातील बहुतांश अर्थव्यवस्था निसर्गाकडून मिळणाऱ्या ''इकोसिस्टम सर्व्हिसेस''वर उभ्या आहेत. शेतीतील परागीभवन, भूजल पुनर्भरण, मृदा सुपीकता, कार्बन शोषण, मत्स्यसंपदा, पूर नियंत्रण, हवामान संतुलन आणि अन्नसाखळीचे संरक्षण या सर्व सेवा निसर्ग मोफत पुरवत असतो. भारतातील कृषी क्षेत्र अजूनही कोट्यवधी लोकांच्या उपजीविकेचा आधार आहे. फळे, भाजीपाला, डाळी आणि तेलबिया उत्पादनासाठी मधमाश्या व इतर परागीभवन करणारे कीटक अत्यावश्यक आहेत. त्यांची संख्या कमी झाली तर उत्पादन घटेल, अन्नधान्य महागेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसेल. याचप्रमाणे समुद्री परिसंस्थांचा ऱ्हास झाल्यास भारतातील लाखो मच्छीमारांच्या उत्पन्नावर परिणाम होईल. किनारी राज्यांमधील आर्थिक चक्रावर त्याचे दूरगामी परिणाम होतील. वनसंपदा कमी झाल्यास पर्जन्यमान, भूजल, तापमान नियंत्रण आणि कार्बन शोषण यंत्रणा कमकुवत होईल.

### पतमानांकनाचा आणि जैवविविधतेचा संबंध काय?

पहिल्या नजरेत जैवविविधता आणि पतमानांकन यांचा काही संबंध दिसत नाही. परंतु, आर्थिक दृष्टिकोनातून तो अत्यंत स्पष्ट आहे.

**कोणत्याही देशाचे पतमानांकन** (Credit Rating) **हे त्या देशाची कर्जफेड करण्याची क्षमता दर्शवते. देशाची आर्थिक वाढ मंदावली, कृषी आणि औद्योगिक उत्पादन घटले, नैसर्गिक आपत्ती वाढल्या आणि सरकारी खर्चाचा ताण वाढला तर गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होतो. जैवविविधतेचा ऱ्हास नेमका याच दिशेने परिणाम करतो. अन्न उत्पादन कमी होते, हवामानाशी संबंधित आपत्ती वाढतात, आरोग्यविषयक खर्च वाढतो आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. परिणामी आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्था देशाकडे अधिक जोखमीच्या दृष्टीने पाहू लागतात.** पतमानांकनातील चार श्रेणींची घसरण म्हणजे परदेशी कर्ज घेणे अधिक महाग होणे. सरकार, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या आणि खासगी उद्योगांना जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागेल. त्याचा परिणाम पायाभूत सुविधा, रोजगारनिर्मिती आणि विकास योजनांवर होईल.

### भारतातील वास्तव अधिक चिंताजनक

भारत जगातील सर्वाधिक जैवविविधता असलेल्या देशांपैकी एक आहे. हिमालय, पश्चिम घाट, सुंदरबन, अंदमान–निकोबार बेटे आणि विस्तीर्ण सागरी क्षेत्र यामुळे देशाला अपार नैसर्गिक संपत्ती लाभली आहे. परंतु, गेल्या काही दशकांत शहरीकरण, जंगलतोड, खाणकाम, किनारी भागातील अतिक्रमणे, प्रदूषण आणि हवामान बदलामुळे या संपदेवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. आज देशभरात रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर, डेटा सेंटर पार्क, ऊर्जा प्रकल्प आणि शहरी विस्तारासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन वापरात बदल होत आहेत. विकासाची ही प्रक्रिया आवश्यक असली तरी तिचा एकत्रित पर्यावरणीय खर्च किती आहे, हा प्रश्न अद्याप दुय्यम मानला जातो.

### महाराष्ट्र : विकास आणि जैवविविधतेमधील संघर्षाचे केंद्र

नेचरच्या अभ्यासातील इशाऱ्यांचा महाराष्ट्राशी संबंध जोडला तर चित्र अधिक स्पष्ट होते. कारण देशातील सर्वात मोठे पायाभूत प्रकल्प सध्या महाराष्ट्रात उभे राहत आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी मोठ्या प्रमाणावर टेकड्यांची कापणी, नद्यांचे प्रवाह बदलणे, नैसर्गिक भूभागात हस्तक्षेप आणि आर्द्रभूमी परिसरातील बदल करण्यात आले. विमानतळ हा राष्ट्रीय गरजेचा प्रकल्प असला तरी या परिसरातील परिसंस्थेवर झालेल्या दीर्घकालीन परिणामांचा अभ्यास पुढील अनेक वर्षे करावा लागणार आहे. शिवाय मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाने राज्याच्या आर्थिक भूगोलात ऐतिहासिक बदल घडवला. परंतु या मार्गामुळे अनेक वनक्षेत्रांचे तुकडीकरण झाले. वन्यजीवांच्या नैसर्गिक स्थलांतर मार्गांवर परिणाम झाल्याच्या चर्चा पर्यावरण तज्ज्ञांकडून सातत्याने होत आहेत. महामार्गाभोवती विकसित होणारी नवीन शहरे आणि औद्योगिक पट्टे भविष्यात पर्यावरणीय दबाव अधिक वाढवू शकतात. प्रस्तावित विरार–अलिबाग मल्टीमोडल कॉरिडॉर, शक्तीपीठ महामार्ग आणि कोकण ग्रीनफिल्ड महामार्ग यामुळे पश्चिम घाट, कोकणातील जंगलक्षेत्र, कृषी जमीन आणि जैवविविधतेवर काय परिणाम होणार याबाबत मोठी चर्चा सुरू आहे. हे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे असले तरी त्यांच्या एकत्रित पर्यावरणीय परिणामांचा विचार करणे तितकेच आवश्यक आहे.

### सह्याद्रीपासून महानगर प्रदेशापर्यंत वाढता पर्यावरणीय दबाव

**जैवविविधतेवरील संकट केवळ नव्या प्रकल्पांपुरते मर्यादित नाही. पश्चिम घाटातील सह्याद्री पर्वतरांग जगातील सर्वात महत्त्वाच्या जैवविविधता क्षेत्रांपैकी एक मानली जाते. मात्र अतिक्रमणे, रिसॉर्ट संस्कृती, डोंगरकपात, रस्ते विस्तार, खाणकाम आणि अनियंत्रित पर्यटनामुळे या परिसंस्थेवर सातत्याने ताण वाढत आहे. मुंबई महानगर प्रदेशातही परिस्थिती वेगळी नाही.** कर्नाळा पक्षी अभयारण्य, फणसाड वन्यजीव अभयारण्य, तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ही क्षेत्रे मुंबई आणि नवी मुंबई परिसरातील शेवटची महत्त्वाची हरित फुफ्फुसे मानली जातात. मात्र शहरांचा विस्तार, पायाभूत सुविधा प्रकल्प, अतिक्रमणे आणि वाढता मानवी हस्तक्षेप यांमुळे या क्षेत्रांभोवतीचा पर्यावरणीय दबाव सातत्याने वाढत आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बफर क्षेत्रांवरील बांधकामांचा दबाव, तुंगारेश्वर परिसरातील अनियंत्रित विकास, कर्नाळा परिसरातील वाढती वाहतूक आणि फणसाड परिसरातील किनारी विकास यामुळे वन्यजीवांच्या अधिवासांचे तुकडीकरण होण्याची चिंता तज्ज्ञ व्यक्त करतात. **याचप्रमाणे कोल्हापूरमधील दाजीपूर–राधानगरी अभयारण्य हे भारतीय गव्याच्या संवर्धनासाठी जागतिक स्तरावर महत्त्वाचे मानले जाते. तर नाशिकमधील नांदूरमधमेश्वर पक्षी अभयारण्य हे महाराष्ट्राचे ''भरतपूर'' म्हणून ओळखले जाते. स्थलांतरित पक्ष्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या आर्द्रभूमींवर हवामान बदल, जलव्यवस्थापनातील बदल आणि मानवी हस्तक्षेपाचा परिणाम होत असल्याबाबत तज्ज्ञ सातत्याने इशारा देत आहेत.**

### खारफुटी : किनारपट्टीची अदृश्य संरक्षण भिंत

मुंबई महानगर प्रदेशात खारफुटी आणि आर्द्रभूमींचे महत्त्व अनेकदा दुर्लक्षित केले जाते. प्रत्यक्षात खारफुटी ही किनारपट्टीची नैसर्गिक सुरक्षा व्यवस्था आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मीरा–भाईंदर आणि वसई–विरार परिसरातील रस्ते, कोस्टल रोड, गृहनिर्माण प्रकल्प, औद्योगिक विकास आणि विविध पायाभूत सुविधांमुळे खारफुटी क्षेत्रांवर सातत्याने दबाव वाढत आहे. खारफुटी केवळ कार्बन शोषत नाहीत, तर पूर रोखतात, समुद्री क्षरण कमी करतात, चक्रीवादळांचा प्रभाव घटवतात आणि मत्स्यसंपदेचे संवर्धन करतात. त्यामुळे खारफुटींचे नुकसान हे प्रत्यक्षात भविष्यातील आर्थिक नुकसानाचे निमंत्रण आहे.

### वाढवण बंदर आणि सागरी परिसंस्था

पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर देशाच्या सर्वात महत्त्वाकांक्षी बंदर प्रकल्पांपैकी एक मानले जात आहे. हे बंदर भारताच्या सागरी व्यापाराचे चित्र बदलू शकते. परंतु त्यासाठी मोठ्या प्रमाणावर ड्रेझिंग, समुद्रतळातील बदल, वाळू उपसा, समुद्री जैवविविधतेवरील परिणाम आणि मच्छीमारांच्या उपजीविकेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. सागरी परिसंस्था कमकुवत झाल्यास त्याचा परिणाम केवळ माशांच्या उत्पादनावर होत नाही; तर किनारी अर्थव्यवस्था, पर्यटन, रोजगार आणि हवामान प्रतिकारक्षमतेवरही होतो. नेचरच्या अभ्यासात अधोरेखित केलेल्या मत्स्यसंपदा आणि समुद्री परिसंस्थांच्या आर्थिक मूल्याशी हा मुद्दा थेट जोडलेला आहे.

### फ्लेमिंगो, आर्द्रभूमी आणि शहरांचा विस्तार

नवी मुंबईतील ठाणे खाडी परिसर आज जगप्रसिद्ध फ्लेमिंगो अधिवास म्हणून ओळखला जातो. हजारो स्थलांतरित पक्ष्यांसाठी हा परिसर आश्रयस्थान आहे. मात्र गेल्या काही दशकांत जेट्टी, रस्ते, गृहनिर्माण, कचरा भराव, औद्योगिक विकास आणि विविध प्रकल्पांमुळे या आर्द्रभूमींवर सतत दबाव वाढत आहे. आर्द्रभूमी ही केवळ पक्ष्यांची निवासस्थाने नसतात. त्या पूर नियंत्रण करतात, पाण्याची गुणवत्ता सुधारतात, कार्बन साठवतात आणि शहरी परिसंस्थेचा समतोल राखतात. त्यांचे नुकसान म्हणजे शहरांना भविष्यातील पूर, उष्णतेच्या लाटा आणि पर्यावरणीय संकटांसाठी अधिक असुरक्षित बनवणे होय.

### जीडीपीच्या पलीकडे विचार करण्याची वेळ

आजही देशांच्या प्रगतीचे मोजमाप प्रामुख्याने जीडीपीच्या आधारे केले जाते. परंतु जीडीपी वाढत असताना नैसर्गिक भांडवल नष्ट होत असेल तर ती वाढ टिकाऊ ठरत नाही. भारत आणि महाराष्ट्र दोघांनीही आता ''नॅचरल कॅपिटल अकाउंटिंग'', ''ग्रीन जीडीपी'' आणि ...पृष्ठ क्र. १५ वर

## निसर्ग म्हणजे... ...पृष्ठ क्र. १४ वरून

''नेचर पॉझिटिव्ह डेव्हलपमेंट'' या संकल्पनांचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. एखादा महामार्ग, विमानतळ किंवा बंदर उभारताना केवळ आर्थिक परतावा नव्हे तर गमावल्या जाणाऱ्या परिसंस्था सेवांचे मूल्यही मोजले गेले पाहिजे.

पुढील दशक निर्णायक

नेचरमधील संशोधनाचा सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे जैवविविधता ही केवळ वन विभाग किंवा पर्यावरण मंत्रालयाची जबाबदारी राहिलेली नाही. ती वित्त मंत्रालय, रिझर्व्ह बँक, गुंतवणूकदार, उद्योगक्षेत्र आणि पतमानांकन संस्थांच्याही चिंतेचा विषय बनली आहे.

आज कापले जाणारे जंगल, बुजवली जाणारी आर्द्रभूमी, नष्ट होणारी खारफुटी, तुकडे पडणारे वन्यजीव अधिवास आणि बदलल्या जाणाऱ्या नद्या हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न राहिलेला नाही. तो उद्याच्या आर्थिक वाढीचा, रोजगाराचा, अन्नसुरक्षेचा, गुंतवणुकीचा आणि राष्ट्रीय आर्थिक स्थैर्याचा प्रश्न बनला आहे. महाराष्ट्रात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, समृद्धी महामार्ग, विरार-अलिबाग कॉरिडॉर, शक्तीपीठ महामार्ग, कोकण ग्रीनफिल्ड महामार्ग, वाढवण बंदर, कोस्टल रोड यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभे राहत आहेत. विकासाची गरज कुणीही नाकारत नाही. पण विकासाच्या प्रत्येक निर्णयासोबत आपण किती जंगले गमावत आहोत, किती खारफुटी नष्ट करीत आहोत, किती आर्द्रभूमी बुजवत आहोत आणि किती वन्यजीव मार्गिका छेदत आहोत, याचाही आर्थिक हिशेब मांडण्याची वेळ आली आहे.

सह्याद्रीतील अतिक्रमणे, कर्नाळा-फणसाड-तुंगारेश्वरवरील वाढता दबाव, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाभोवतीचे शहरी अतिक्रमण, नांदूरमधमेश्वर आणि ठाणे खाडीसारख्या आर्द्रभूमींवरील संकटे, खारफुटींची सातत्याने होणारी कत्तल आणि वाढवणसारख्या किनारी प्रकल्पांमुळे निर्माण होणारे पर्यावरणीय प्रश्न ही वेगवेगळी प्रकरणे नाहीत. ती महाराष्ट्राच्या विकास मॉडेलमधील एकाच समस्येची वेगवेगळी लक्षणे आहेत. नेचर नियतकालिकातील अभ्यासाने दिलेला ४९ अब्ज डॉलर्सचा इशारा हा भविष्यातील अंदाज असला तरी त्याची बीजे आज महाराष्ट्रात आणि देशभरात रोवली जात आहेत. निसर्गाचे संरक्षण हा खर्च नसून आर्थिक स्थैर्याची गुंतवणूक आहे. अन्यथा उद्या देशाचे पतमानांकन घसरल्यावर, कर्ज महागल्यावर आणि हवामान आपत्तींचा खर्च वाढल्यावर त्यासाठी जबाबदार केवळ निसर्गाचा ऱ्हास नसेल, तर विकासाच्या नावाखाली त्याकडे दुर्लक्ष करणारी आपली सामूहिक मानसिकता असेल.

## कॉक्रोच जनता पार्टी विचार करायला हवा..... ...पृष्ठ क्र. ८ वरून

खटल्याबिटल्याविनाच गेली पाच वर्षं आत आहे. (यालाच म्हणतात, न्यायव्यवस्थेला एक 'हत्यार' म्हणून वापरणं...न्यायपालिका ही लोकशाही व्यवस्थेचा एक खांब होय, वगैरे संपलं.)

आणखी एक घडामोड लक्षात घेतली पाहिजे. **सीजेपी म्हणजे केवळ एक कॅटलिस्ट, एक निमित्त, ज्याच्याद्वारे देशातल्या तरुणांमधला असंतोष बाहेर आला, सीजेपीला यापलीकडे काही प्रयोजन नाही, असं सुरुवातीला जरी वाटलं, तरी तसं राहिलेलं नाही. त्यांच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषद घेतली आहे. अभिजीत दिबके यांनी पूर्वी आम आदमी पक्षाचं काम केलं आहे, म्हणजे त्यांना राजकीय कामाचा थोडाबहुत अनुभव आहे. सध्याच्या वातावरणावरून ते केवळ 'अकॅडेमिक', म्हणजे प्रतिकात्मक कृती करून थांबतील, असं वाटत नाही. सध्या त्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदावरुन हटवण्यासाठी सरकारला आठवड्याभराची मुदत दिली आहे. पुढे ते काय करतील? पक्षीय राजकारणात उतरतील? तसे ते उतरले, तर भाजपची, म्हणजेच मोदी सरकारची भूमिका काय असेल?**

त्यांना 'इडी' लावला जाईल का? सत्तेचा सर्वतोपरी उपभोग घेऊन मालामाल झालेल्या काँग्रेस पुढाऱ्यांसाठी इडीचा मार्ग कामाचा ठरला. पण अभिजीत दिबके तरुण आहेत. ते किंवा सीजेपीच्या वतीने बोलणारे इतर, यांच्यावर इडीचं अस्त्र काम करेल, याची शाश्वती नाही.

**त्यांच्या सभेत संघाच्या कुठल्याशा टपरी संघटनेच्या लोकांनी घुसून गोंधळ करायचा आणि मग गोंधळ करणाऱ्या गुंडांना पकडण्याच्या ऐवजी गुंडगिरीला विरोध करणाऱ्यांना पोलिसांनी पकडून न्यायचं आणि त्यांच्यावर कुठली कुठली कलमं लावायची, हा (परवा, बिहारात खान सरांच्या बाबतीत झाला तसा) प्रकार होईल का? जंतर मंतरवर हा प्रयत्न झाला. पण तरुण लोक साले चलाख झालेत. ते कायम मोबाईलवर शूटिंग चालू ठेवून असतात. तरी अभिजीत दिबके मुसलमान असता, तर खुशाल काहीतरी दडपून देता आलं असतं; पण हा मुसलमान तर नाहीच, उलट दलितांपैकी आहे. मतपेटीविषयी** कमाल जागृत असणाऱ्या भाजपला त्यामुळे थोडं जपून रहावं लागणार.

पुढे. भाजपप्रणित आधुनिक चाणक्यगिरी म्हणजे दमबाजी करणं किंवा काहीतरी लफडं उकरून काढून ब्लॅकमेल करणं आणि यातलं काहीच जमलं नाही, तर लालूच दाखवून वश करणं. ही वेळ यायला अजून अवकाश आहे. तोपर्यंत आधुनिक चाणक्य धीर धरतील. असंतोषाला वाचा फुटली आणि विरोधाची धार बोथट झाली, असं होऊ शकतं. मग दिबकेंना मॅनेज करता येऊ शकतं.

एक लक्षात घ्यायला हवं. भाजप हा पक्ष आणि मोदी सरकार यांना दयामाया नाही. विरोधकांना दडपण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. शेतकऱ्यांच्या मोर्चावर त्यांनी ऐन हिवाळ्यात गार पाण्याचे फवारे मारले. त्यांच्या रस्त्यावर खंदक खणले. त्यांना राष्ट्रद्रोही ठरवलं. अरविंद केजरीवाल यांना खोट्या आरोपाखाली अटक केली आणि न्यायालयाने आदेश दिला तेव्हाच सोडलं. ताजं उदाहरण घ्यायचं तर १७ ते १९ वर्षे वयाच्या मुलांनी शिक्षणव्यवस्थेतला भ्रष्टाचार उघडा पाडल्यावर भाजपची/सरकारची पहिली प्रतिक्रिया काय झाली? तर हे पाकिस्तानी आहेत, दहशतवाद्यांना सामील आहेत, परदेशातून पैसे घेऊन इथे मुद्दाम अशांतता माजवत आहेत, असले आरोप झाले, ट्रोलिंग झालं. राष्ट्र म्हणजे सरकार, सरकार म्हणजे पक्ष, पक्ष म्हणजे पक्षाचा नेता ही अस्सल फॅसिस्ट साखळी देशभरातल्या जनतेच्या गळी उतरवण्याच्या उद्देशाने हे सगळं चालू आहे. नेत्याला, पक्षाला विरोध म्हणजे राष्ट्रद्रोह. या मोहिमेचा एक भाग म्हणून न्यायव्यवस्था, प्रशासनव्यवस्था आणि इतर सर्व स्वायत्त संस्था आणि अर्थात मीडिया यांना वाकवणं चालू आहे. म्हणूनच पंजाबमधल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतपत्रिकांच्या माध्यमातून झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपचा नंबर चौथा पाचवा लागला, याला अर्धीमुर्धीच प्रसिद्धी मिळत आहे.

पण, या गोष्टीला आणखी एक बाजू आहे आणि ती जास्त गंभीर, जास्त महत्त्वाची आहे.

या देशात धर्म, जाती, भाषा, चालीरीती अशा एका एका बाबतीत प्रचंड वैविध्य आहे. देशभरातली समस्त जनता जरी स्वत:ला भारतीय मानत असली, देशावर प्रेम करत असली; तरी यातल्या एका एकाचा वापर करून जनतेत फूट पाडणं सहज शक्य आहे. देशावर संकट येणे, हीच जणू सर्व लोकांनी एकत्र येण्याची एकमेव प्रेरणा आहे.

नाही! आणखी एक मुद्दा देशभरच्या लोकांना एक करु शकेल. हा मुद्दा आहे रोजगाराचा. तरुण, शिक्षित बेराजगारांचा. भाषा, प्रांत, जात काहीही असो; रोजगार नसण्याची बोच संवेदनशील मनाला सारखीच असते. अधिकृत आकडेवारी सांगते की गेल्या दहा वर्षांमध्ये शिक्षितांना रोजगार मिळण्याची, समाधानकारक कमाई मिळण्याची संधी कमी झाली आहे. कोणाच्या तुलनेत? तर श्रमिकांच्या तुलनेत!

कॉक्रोच जनता पक्षाला मिळणारं पाठबळ इथून येतं आहे.

### तरुणांनी केलेल्या उठावातून सत्ताबदल होण्याची उदाहरणं?

१९६८ साली फ्रान्समध्ये अध्यक्ष द गॉल यांच्या पदच्युतीचं उदाहरण जुनं. 'अरब स्प्रिंग' हे अलीकडचं. पण ट्युनिशियात सुरू झालेलं हे प्रकरण ज्या वेगाने अरब राष्ट्रांमध्ये पसरलं, त्या प्रमाणात सत्ता उलथल्या नाहीत. पण इतकं दूर तरी कशाला जा? नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका ही अगदी निकटची आणि अगदी कालपरवाची उदाहरणं आहेत. बाहेर न जाता देशाचा भूतकाळ तपासला, तर १९७४ साली गुजरातमध्ये झालेल्या नवनिर्माण आंदोलनाने चिमणभाई पटेलांची सत्ता गेली होती. त्यामागोमाग झालेल्या बिहारातल्या 'संपूर्ण क्रांती'ने तर पंतप्रधान इंदिरा गांधींच्या सिंहासनाला गदागदा हलवलं होतं.

तसं होईल? तो जोम, ती कल्पकता पुन्हा दिसून येईल? देशात सध्या राज्यावर असलेलं सरकार सत्तेसाठी वाटेल त्या थराला जाणारं आहे. आणि त्यांच्यापाशी सर्व संसाधनं आहेत. सत्ता हीच मुळात प्रभावी गोंदासारखी असते. छोटेमोठे पुढारी सत्तेला चिकटून राहतात. आपापल्या अनुयायांना 'मॅनेज' करतात.


दुसऱ्या बाजूला तरुण मन बेदरकार असतं, हळवं असतं, कृती करताना मागेपुढे न बघणारं असतं. असं इतिहास सांगतो.

**सारांश असा की, सीजेपीचं जे होईल ते होईल. सीजेपी ही घडामोड म्हणजे एक लक्षण आहे. देशभरातलं तरुण मन अस्वस्थ आहे, अशांत आहे, बेकारीच्या कोंडीतून सुटण्यासाठी आकांताने धडपडत आहे. NEETसारख्या परिक्षेमधून स्वत:चं भवितव्य घडवण्यासाठी शर्थीने प्रयत्न करत आहे. या मनाला आशा दाखवणारं आज फार काही नाही. उलट, 'एआय'चा बागुलबुवा भीती घालतो आहे. अशा वेळी त्यांना अभिजीत दिबकेमध्ये आशेचा किरण दिसतो आहे. अभिजीत दिबके आणि त्यांची सीजेपी यांच्याकडून त्यांच्या अपेक्षा विफल झाल्या तर हे तरुण कुठे जातील? काय करतील? हरण्यासारखं हाती काहीच नाही, अशा स्थितीत ते कोणता मार्ग चोखाळतील?**

हे खरं संकट आहे. या संकटाला तोंड देण्याची तयारी समाजाकडे, सरकारकडे, व्यवस्थेच्या चौकटीकडे आहे?

*...हेमंत कर्णिक* (fb वरचा संदेश)









*'धर्मराज्य पक्ष' प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'शी संलग्न असलेल्या आणि अध्यक्ष राजन राजे यांच्या मार्गदर्शनाखाली मे. अंशुल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्री प्रा. लि., रोहा (रायगड) येथील कामगारांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी सुरू केलेल्या बेमुदत संपाच्या ६०व्या दिवशी 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव समीर चव्हाण, धर्मराज्य पक्षाचे सचिव नरेंद्र पंडित व प्रेसिहोलचे सुब्रम्हण्यम (सुब्बू) यांनी संपस्थळी भेट देऊन कामगारांशी संवाद साधला. तसेच संघर्षाच्या या निर्णायक टप्प्यात कामगारांनी एकजूट कायम ठेवून आपला लढा अधिक ताकदीने पुढे न्यावा, असे आवाहन करत त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन दिले.*




समाजात वावरताना आजुबाजुला व्यवसायधंद्याच्या हितसंबंधांपलिकडे, इतरेजनांची काही विशेष दखल घेणं, 'अव्यावसायिक-वृत्ती'चं (UnProfessional) लक्षण ठरतं. व्यावसायिक कारणाव्यतिरिक्त 'माणूस आणि दगडमाती', 'माणूस आणि वस्तू' यात अंगभूत असलेला सजीव-निर्जीव फरक समजून-उमजून घेण्याचा व माणसातल्या चेतनेचा किमान सन्मान राखण्याचा विषयच संपून जातो! त्यामुळे, भांडवली-समाजाच्या मानसिकतेचा डोलारा आतून पोकळ




बनत जातो व प्रत्येक पिढीगणिक त्या डोलाऱ्याची उंची आयफेल-टॉवरसारखी वाढत जाते; पण, त्यालाच खेटून असलेली पोकळी देखील वाढत चालल्याने तो डोलारा, तो मनोरा अधिकाधिक ठिसूळ बनत जातो... आयुष्यात उद्भवणाऱ्या साध्यासुध्या समस्यांनी सुद्धा तो ढासळून पडतो व समाजात व्यसनाधीनतेचं आणि आत्महत्यांचं एकच पीक यायला सुरुवात होते!

***...राजन राजे***
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०